




# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर








वर्ष २९ वे | अंक १२ | पाने ४ | मंगळवार | दि. १३ मे २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# पाणी व रक्त सोबत वाहणार नाही

## पंतप्रधान मोदी: अणूबॉम्बची धमकी देवू नका सिंदूर संपले नाही: पुन्हा आगळीक केल्यास चोख प्रत्युत्तर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:-**

भारताने पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या तळावर आणि सैन्यांच्या तळांवर केलेली ऑपरेशन सिंदूरची कारवाई ही केवळ स्थगित केली आहे, हे ऑपरेशन संपलेले नाही. येत्या काळात आम्ही पाकिस्तानच्या प्रत्येक कारवाईवर लक्ष ठेवू आणि ते कशाप्रकारे वागतात यावर आमची प्रतिक्रिया अवलंबून असेल. भारताची तिन्ही सैन्यदल आणि इतर सर्व सहकारी अलर्ट मोडवर आहेत, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तान आणि दहशतवादाला सज्जड दम भरला. आज मोदींनी व्हिडीओ संदेशाद्वारे देशाला संबोधित केले. त्यावेळी ते बोलत होते.

सर्जिकल स्ट्राइक आणि एअर स्ट्राइक नंतर ऑपरेशन सिंदूर ही भारताची दहशतवादा विरोधातील नवी निती आहे ऑपरेशन सिंदूर मुळे दहशतवादा विरोधातील लढ्यात एक नवा बेंचमार्क सेट करण्यात आला आहे. भारतावर दहशतवादी हल्ला झाला तर सडेतोड उत्तर मिळेल आम्ही आमच्या पद्धतीने आणि आमच्या अटी शर्तीवर प्रत्युत्तर देऊ. दहशतवादाची पाळीमुळे उकडून काढण्यासाठी जंगल पछाडू. कोणत्याही प्रकारची अण्वस्त्र संदर्भातील धमकी भारत खपवून घेणार नाही. अणवस्त्रांच्या आडून सुरू असलेल्या दहशतवादावर भारत वेळोवेळी कठोर प्रहार करत राहील. आम्ही दहशतवादी आणि ज्यांच्या कृपेने दहशतवाद सुरू आहे, त्या आकांना वेगवेगळ्या पद्धतीची ट्रीटमेंट देणार नाही, असे मोदींनी खडसावून सांगितले.

पाकिस्तानचा दहशतवादाला पाठिंबा देणारा चेहरा जगासमोर आला, ज्यावेळी मारल्या गेलेल्या दहशतवादांच्या अंत्ययात्रेत पाकिस्तानचे मोठमोठे अधिकारी उपस्थित राहिले. देशाने पुरस्कृत केलेला दहशतवाद असल्याचा हा सर्वात मोठा पुरावा आहे. आम्ही भारताच्या नागरिकांचा



सुरक्षेसाठी कायम अशा पद्धतीचे कठोर पावले उचलत राहू. पाकिस्तानला आपण युद्धभूमीत कायमच धूळ चारली आहे त्यात ऑपरेशन सिंदूर हा एक नवा उच्चांक भारताने गाठला आहे आम्ही वाळवंटापासून ते डोंगराळ भागापर्यंत सर्वत्र आपल्या सामर्थ्याचे दर्शन घडवून आणले आणि त्यासोबतच नव्या युगातील युद्धजन्य परिस्थितीतही आपले सामर्थ्य दाखवून दिले, असेही मोदी म्हणाले.

सैन्याने प्रचंड शौर्य दाखवलं. आम्ही लष्कराला दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिलं. लोकांना त्यांच्या कुटुंबीयांसमोर मारण्यात आलं. ऑपरेशन सिंदूर ही न्यायाची अखंड प्रतिज्ञा आहे. भारतीय सैन्याने पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर अचूक हल्ले केले. भारत इतका मोठा निर्णय घेऊ शकेल याची दहशतवाद्यांनी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. जेव्हा राष्ट्र सर्वोच्च असते तेव्हा असे कठोर निर्णय घेतले

### आता पाकव्याप्त काश्मीरवरच चर्चा होईल

पाकिस्तानसोबत चर्चा होईल, ती पाकव्याप्त काश्मीरवरच होईल. आज बुद्ध पौर्णिमा आहे. भगवान बुद्धाने आपल्याला शांतीचा मार्ग दाखवला आहे. शांततेचा मार्ग सुद्धा शक्तीने होतो. भारताचे शक्तिशाली होणं गरजेचं आहे आणि गरज पडल्यावर त्या शक्तीचा वापर करणेही आवश्यक आहे. मागील काही दिवसांत भारताने तेच केले आहे, असे मोदी देशवासीयांशी बोलताना म्हणाले.

### कुंकू पुसण्याचा परिणाम दहशतवाद्यांना कळला

या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देश, प्रत्येक नागरिक, समाज, प्रत्येक राजकीय पक्ष एका सूरात दहशतवादाविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी उभे राहिला. आम्ही दहशततवाद्यांना मातीत गाडण्यासाठी भारताच्या सैन्याला स्वातंत्र्य दिले. आणि आज प्रत्येक दहशतवादी, प्रत्येक दहशतवादी संघटनेला कळलं आहे की, आपल्या माता-भगिनी आणि मुलींच्या कपाळावरचं कुंकू पुसण्याचा परिणाम काय होतो.

जातात. भारत इतका मोठा निर्णय घेऊ शकेल, याची दहशतवाद्यांनी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. दहशतवाद्यांनी आपल्या बहिणींचं कुंकू पुसलं होतं, म्हणून भारताने दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केलं. भारताने १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा केला. भारताच्या या कृतीने पाकिस्तान हादरला आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.


# सहकारी संस्थांचा अभ्यास करून अडचणी शोधा

## खा.शरद पवार

**मुंबई/प्रतिनिधी:-**

महाराष्ट्रातील सगळे सहकारी कारखाना पाहिले तर काय चित्र दिसतं. आधी ८० टक्के सहकारी कारखाने होते आणि २० टक्के खासगी कारखाने होते आता ५० टक्के खासगी कारखाने झाले आहेत. देवेंद्र फडणवीस याना विनंती आहे की एक कमिशन अपॉइंट करा आणि या सहकारी संस्थाचा अभ्यास करा. नेमक्या काय अडचणी आहेत हे पाहा, असे उद्गार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले.

मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये दख्खनचा उठाव आणि सहकाराची मुहूर्तमेढ घटनेच्या १५० वर्षपुर्तीनिमित्त 'सहकाराचे सक्षमीकरण आणि राज्य शासनाचे धोरण' विषयावरील परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यावेळी शरद पवार बोलत होते. यावेळी



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शरद पवार देखील उपस्थित होते.

शरद पवार म्हणाले, दख्खनचा उठाव इथ जो संघर्ष झाला त्यावेळी इंग्रजांना शेतकऱ्यांच दुःख समजलं आणि त्यांनी उपाय योजना केल्या. त्यावेळी सावकार आणि व्यापारी यांच्याकडून कर्ज शेतकऱ्यांना घ्याव लागत होतं मात्र ते बंद झालं आणि सहकारातून त्यांना कर्ज मिळू लागलं. राज्य सहकारी बँकेने हा कार्यक्रम आयोजित केला आहे. पूर्वी साखर कारखानदारी नव्हती गूळाचा धंदा होता. एक व्यापारी गूळ करायचा आणि त्याच त्या मार्केटवर दबाव असायचा मात्र हे बदलण्यात आलं आणि त्यावर पर्याय म्हणून या बँकेची स्थापना करण्यात आली.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, महाराष्ट्रातील सगळे सहकारी कारखाना पहिले तर काय चित्र दिसतं. आधी ८० टक्के सहकारी कारखाने होते आणि २० टक्के खासगी कारखाने होते आता ५० टक्के खाजगी कारखाने झाले आहेत. देवेंद्र फडणवीस याना विनंती आहे की एक कमिशन अपॉइंट करा आणि या सहकारी संस्थाचा अभ्यास करा. नेमक्या काय अडचणी आहेत हे पाहा.


देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात ५० टक्के सहकारी साखर कारखाने खासगी झाले आहेत. हे शरद पवारांनी सांगितलं हे खरं आहे. साखर उद्योगात केवळ साखरेवर कारखाना चालू शकत नाही आता त्याच्याशी संबंधित इतर व्यवसाय करावे लागणार आहे. सहकारी कारखान्यात प्रोफेशनल काम पाहिला मिळत नाही. मोठ्या प्रमाणात त्या ठिकाणी खोगिरभरती पाहिला मिळत आहे. सहकारातील महत्वाचा घटक म्हणजे सहकारी संस्था आहेत. आम्ही सहकार कायद्यात नवीन नियम घातला. सेल्फ रीडेव्हलपमेंट ही योजना देखील आम्ही राबवत आहोत.

# कराडमधील फटाक्याच्या दुकानाला आग

**कराड/प्रतिनिधी:-**

कराड शहरातील एसटी स्टॅडजवळ असलेल्या सनबिम कॉम्प्लेक्सच्या पाठीमागे फटांक्याच्या एका दुकाणार आज रात्री ९ च्यासुमारास अचानक आग लागली, या आगीची भिषणता मोठ्या प्रमाणात असल्याने धुराचे लोट निर्माण झाले होते. या गोडाऊनमध्ये फ टाक्याचे साहित्य असल्याने फटाक्यांचा आवाजही मोठ्या प्रमाणात येत होत. यामुळे तेथील दुकानदारांच्यात व नागरीकांची धावपळ आग विजवण्यासाठी सुरू होती. कराड पालिकेच्य अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले होते. रात्री उशीरा ही आग विजवण्यात यश आले.या आगीत गोडाऊनमधील फ टाक्याचे व इतर साहित्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती, त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी गर्दी हटवण्याचे प्रयत्न केले.

आज साडेआठनंतर कराडची बाजारपेठ बंद होत असताना अचानक सनविम कॉम्प्लेक्सच्या पाठिमागील इमारतीमध्ये फ टाक्यांचा मोठ्याने आवाज होवू लागला यामुळे लगतच्या दुकानदारांनी त्या दुकानाकडे धाव घेतली. या या दुकानातून आगीचा लोट बाहेर पडताना दिसू लागला आग लागल्याने या ठिकाणी मोठा गोंधळ सुरू झाला. सदरचे दुकान हे बेसमेंटला असल्याने मदत करणेही अवघड झाले होते. तातडीने कराड पालिकेच्या अग्नीशामक दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी ही आग विजवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. मात्र, दुकानातून मोठ मोठ्याने फटाक्याचे आवाज येत



असल्याने या ठिकाणी जाताना नागरीकांना काळजी घ्यावी लागली. ही आग कशामुळे लागली हे समजू शकले नाही. रात्री उशीरा आग विजवण्यात यश आले. सुदैवाने कोणतीही दुदैवी घटना घडली नाही. घटनास्थळी पोलीस दाखल झाले होते.

सद्यस्थितीत आग लागण्याचे कारण स्पष्ट झालेले नसून, प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किट अथवा इतर तांत्रिक कारणामुळे ही आग लागली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## मारहाण प्रकरणी दोन जणांविरोधात गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:-**

मारहाण प्रकरणी दोन जणांविरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ११ रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास हॉर्न वाजवण्याच्या रागातून गौरव अनिल नगरे रा. झरेवाडी, पोस्ट करंडी, ता. सातारा आणि त्याचा भाऊ अभिजीत यांना टोच्याने आणि कोयत्याच्या उलट्या बाजूने मारहाण केल्याप्रकरणी करण जगन्नाथ चव्हाण आणि विशाल भोसले दोन्ही रा. डबेवाडी, ता. सातारा यांच्या विरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार निकम करीत आहेत.

# पिंपरी चिंचवडमध्ये तरुणीची हत्या

**पुणे/प्रतिनिधी:-**

पिंपरी चिंचवडमधील वाल्हेकरवाडी परिसरात एका १८ वर्षीय तरुणीची हत्या करण्यात आली. रविवारी रात्री भररस्त्यात तरुणीवर धारदार शस्त्राने वार करण्यात आले, यात ती गतप्राण झाली. पोलिसांनी घटनेची गंभीर दखल घेत आरोपीला शोधण्यासाठी वेगाने तपास सुरू केला. यात शेजाऱ्यानेच तरुणीची हत्या केल्याचे समोर आले. पोलिसांनी त्याला अटक केली आहे.



कोमल भरत जाधव (वय १८) या तरुणीची रविवारी (११ मे) रात्री हत्या करण्यात आली होती. कोमल जाधव ही पिंपरी चिंचवडला लागून असलेल्या वाल्हेकरवाडीत कुटुंबासोबत राहत होती. कृष्णामाई परिसरात तिचे घर आहे.

रविवारी कोमल घरात होती. त्यावेळी बाईकवरून दोन जण आले. त्यांनी तिला घराबाहेर बोलावून घेतले. कोमल घरातून बाहेर आली. ती समोर येताच आरोपींनी तिच्यावर धारदार शस्त्राने वार केले. यात तिचा जागेवरच मृत्यू झाला.

हत्येची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा केल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. आरोपीला शोधण्यात पोलिसांना २४ तासातच यश आले.

कोमल जाधवच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी शेजारी राहणाऱ्या ४५ वर्षीय उदयभान यादव (मुख्य आरोपी) आणि त्याचा सख्खा भाचा अशा दोघांना अटक केली. उदयभान यादव हा मूळचा उत्तर प्रदेशचा आहे.

पोलिसांनी आरोपीची चौकशी केली. पोलिसांनी केलेल्या तपासातून अशी माहिती समोर आली की, मयत कोमल जाधव आणि आरोपी हे शेजारी राहत होते. त्या दोघांमध्ये संबंध होते. त्याचबरोबर दोघांमध्ये आर्थिक व्यवहारही झाले होते. त्यातूनच दोघांमध्ये वाद झाले. त्यानंतर आरोपीने भाच्याच्या मदतीने हत्या केली.

# आज दहावीचा निकाल

**मुंबई/प्रतिनिधी:-**

दहावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेचा आज निकाल लागणार आहे. आज दुपारी १ वाजता विद्यार्थ्यांना ऑनलाईन दहावीचा निकाल पाहता येणार आहे.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ लवकरच दहावीचा निकाल जाहीर करण्याची शक्यता वर्तवली जात होती. बारावीचा निकाल लागल्यानंतर १० दिवसांच्या आत निकाल लागेल, असे सांगण्यात आले होते. त्यामुळं विद्यार्थी निकालाची आतुरतेने वाट पाहत होते. अखेर उद्या १० वीचा निकाल लागणार आहे. दरम्यान, यंदा राज्यातून १६ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसले होते. राज्यातील २३ हजार ४९२ माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी यासाठी नोंदणी केली होती. निकाल लागल्यानंतर विद्यार्थ्यांना दुपारी १ वाजल्यापासून त्यांचे गुण ऑनलाइन पाहता येतील. विद्यार्थ्यांना खाली दिलेल्या सर्व साईटवर जाऊन निकाल पाहता येणार आहे.

दरम्यान, यावर्षी बारावीचा निकाल ५ मे २०२५ रोजी लागला होता. त्यामुळे आता सगळ्यांचे लक्ष १० वी च्या बोर्डाच्या परीक्षेच्या निकालाकडे लागले होते. बारावीचा निकाल लवकर लागल्यामुळे पदवी प्रवेश प्रक्रिया लवकर सुरू होईल.

# नाव पोलीस स्टेशन मसूर..! पण कर्तव्यात कसूर..!

## अर्थपूर्ण तडजोड व दलालांचा वाढता हस्तक्षेप.! ठरतोय चिंतेचा व चर्चेचा विषय..!

**भाग-२**

**मसूर/प्रतिनिधी:-**

सदरक्षणाय... खलनिग्रहणाय...! म्हणजे च सज्जनांचे संरक्षण आणि दुर्जनांचे निर्दलन.. यथार्थ नायनाट करणे.. बंदोबस्त करणे... असे पोलीस दलाचे घोषवाक्य आहे मात्र अलीकडल्या काळात मसूर पोलीस स्टेशन मध्ये याचा अभाव दिसून येतो कारण नाव पोलीस स्टेशन मसूर..! पण कर्तव्यत कसूर..! अशी आजची स्थिती झाली आहे. तक्रारदारांना न्याय मिळत नसल्याने सर्वसामान्यांची मोठी गोची व कुचंबना होते येथे तक्रारींचा मोठा ओघ असला तरी पोलीस नोंदीत बऱ्याच तक्रारी असल्या तरी त्या परस्पर रफादफा केल्याचे दिसते. सध्या या मसूर पोलीस स्टेशन मध्ये खाजगी दलालां चा राबता व ऊठबस ही एक डोकेदुखी ठरली आहे हा चिंतेचा विषय झाला असून सध्या अर्थपूर्ण तडजोडीने चर्चेत असलेले मसूर पोलीस स्टेशनचे कारभारी कर्तव्यात कसूर करताना दिसतात याची वरिष्ठ पोलीस अधिकारी दखल घेतील काय..?असा सवाल जनता विचारत आहे..!

**तक्रारींचा ओघ.. तरीही तडजोडीचाच पाढा..!**

मसूर परिसरातील वाढत्या विविध गुन्ह्यांचा क्राईम रेट वाढत्या तक्रारी यामुळे मसूर पोलीस दूरक्षेत्र चे मसूर पोलीस स्टेशन व्हावे ही बऱ्याच वर्षाची जनतेची मागणी आता पूर्ण झाली आहे त्यामुळे जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत पूर्वीपेक्षा येथे जादा पोलीस कर्मचारी वर्ग कार्यरत आहेत तरीही पूर्वीचे मसूर पोलीस दूरक्षेत्र च बरे...! असे म्हणण्याची दुर्दैवाने मसूरकरांच्या वर वेळ आली आहे.

मसूर पोलीस पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात ३० ते ३५ लहान मोठी गावे येतात मसूर परिसरात अनेक गावे राजकीय दृष्ट्या संवेदनशील आहेत स्वतंत्र पोलीस ठाण्यापेक्षा येथे काम जास्त आहे मसूर भागात दैनंदिन येणाऱ्या तक्रारीचे प्रमाण सुद्धा मोठ्या प्रमाणात आहे दैनदिन भांडणे मारामाऱ्या जमिनीचा वाद राजकीय संघर्ष पूर्णव्यमानस्य घरगुती कौटुंबिक वैवाहिक वैयक्तिक वाद विवाद चोऱ्या माऱ्या घातपात अपघात गळफास आत्महत्या तसेच भुरट्या व गल्ली दादांचे कारनामे अशा विविध तक्रारींचा ओघ मोठ्या प्रमाणात मसूर पोलीस ठाण्यात दिसतो कधीही पोलीस स्टेशनमध्ये नजर टाकली तरी तेथे तक्रारदारांची गर्दी दिसते एवढ्या तक्रारी दाखल असूनही पोलीस नोंदीत अर्थपूर्ण तडजोडी बरोबरचनीलचा च पाडा असतो. हे एक न सुटणार कोडेच आहे कित्येक तक्रारी पोलीस घेतच नाहीत तर घेतलेल्या तक्रार यांची कितपत दखल होते हा एक संशोधनाचा विषय बनला आहे,

**तक्रार धारकांचे विचित्र अनुभव: चाप्टर केस द्या. नाहीतर दोघे जावा कोर्टात.!**

तक्रार दाखल करण्यास गेलेल्या तक्रारदारांचा दिवसाच्या दिवस येथे जातो ज्या तक्रारीचा सोक्षमोक्ष केवळ काही वेळात नुसता पोलीस खाक्या दाखवला तरी होणार असतो त्यासाठी हेलपाटे मारण्याची वेळ येते ज्याच्या विषयी तक्रार आहे त्याला बोलवण्यात कित्येक दिवस लागतात त्याला निरोप देणे पोलिसांना कष्टदायक वाटते आम्हाला एवढेच काम आहे का असा प्रतिसाद करून उलट तक्रारदारालाच घरचा रस्ता दाखवला जातो एवढेच नव्हे तर तक्रार ज्याच्या विरोधात आहे त्याला समज देण्याऐवजी तक्रारदाराचा विरोधात चाप्टर केस दाखल करण्याचा सपाटा मसूर पोलिसांनी अलीकडे सुरू केला आहे किरकोळ बाबीसाठी सुद्धा पैशाची मागणी हा चिंतेचा विषय बनला आहे कित्येक तक्रारी अर्जांची नोंदच होत नाही त्या परस्परस कशा मिटवल्या जातात..? हा एक संशोधनाचा विषय बनला आहे दोन्ही बाजूकडून हात ओले नाही झाले तर जावा कोर्टात असा अलिखित नियम सांगितला जातो त्यामुळे न्याय कुणाला मागायचा.? असा प्रश्न तक्रारदाराला भेडसावतो सध्या अर्थपूर्ण तडजोडीसाठी मसूर पोलीस स्टेशन आहे की काय.? असा सवाल सामान्य जनतेतून होत आहे त्यातच किरकोळ तक्रारीत राजकीय हस्तक्षेप होत असल्याने कारवाईवर मर्यादा येत असल्याचे दिसते कित्येकदा कारवाई केवळ कागदोपत्रीच असते खिसा गरम असला तरच पोलीस स्टेशनची पायरी चढा असे ब्रीद सध्या झाले आहे त्यामुळे सामान्यांच्या पदरी निराशा होते. त्यामुळे मसूर पोलीस स्टेशन मध्ये तक्रारी नको रे बाबा असा कित्येकांचा अनुभव आहे.

**दलालांचा हस्तक्षेप: त्यांना साहेबांचा वरदहस्त..?**

**अरेरावी आवरा: निष्क्रियतेमुळे प्रतिमा मलीन..!**

काही तक्रारी मिटवण्यासाठी सध्या मसूर पोलीस स्टेशनमध्ये काही खाजगी खास दलालांची नेमणूक केल्याची जोरदार चर्चा आहे एखादा गुन्हा दाखल झाल्यास संबंधित दलाल तक्रारदार आणि विरोधकाला गाठून मी साहेबांच्या जवळ चा आहे मी सर्व मिटवतो अशी बतावणी केली जाते त्यामुळे बहुतांशी तक्रार यांचा निपटारा बाहेरच्या बाहेर तेच करतात आणि मिटवा मिटवी चा तेच दर ठरवतात एवढी त्याची उठबस व हस्तक्षेप वाढला आहे साहेबांच्या आशीर्वादाने दलाली सुरु असल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे त्यामुळे येथे पोलिसांची अन दलालांची साखळी आहे की काय..? असा सवाल उपस्थित होत आहे. पोलीस हे रक्षण करते की भक्षण करते..? याची व्याख्या करणे सुद्धा मुश्किल झाले आहे याशिवाय दसरी च्या कारभाऱ्याची आरे रावेची भाषा ही जनतेच्या मनात चीड निर्माण करणारी आहे तर सामान्य तक्रारदार ते बुजुर्ग ज्येष्ठां साठी अवमान कारक आहे त्यांना कुणी तरी आवरण्याची गरज आहे त्यांच्या अशा मनमानी आणि अकार्यक्षम कार्यपद्धतीने मसूर पोलीस स्टेशनची प्रतिमा मलिन होत आहे येथे तक्रारदाराबरोबरच ज्याचे विरुद्ध तक्रार आहे त्यांनाही गिऱ्हाईक करण्याची दलाल यांच्यामुळे प्रथा वाढीस लागले आहे इथे फक्त वजनदार तक्रारदाराचे चालते पोलिसांच्या या निष्क्रिय प्रतिमेमुळे कित्येक जण तक्रार करण्यास धजावत नाहीत कारण तिथे गेल्यावर न्याय मिळेलच याची शाश्वती नाही एवढा पोलिसांनी विश्वास गमावला आहे.

**वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घ्यावी..! जनतेची अपेक्षा..!**

महिन्याभरात एखादी दुसरी मोठी कारवाई केल्यासारखे दाखवायचे गुन्ह्यांची व तक्रारींची संख्या नगण्य दाखवून वरिष्ठाकडून चांगल्या कामाची पोच मिळवण्यात मश्गुल असलेल्या मसूर पोलिसांना त्यांच्या कर्तव्याची कोणी जाणीव करून देईल काय..! अशी जनता प्रश्न विचारत आहे जिथे ठोस कारवाईची गरज आहे तिथे जुजबी कारवाई करायची तक्रारदाराने केलेल्या तक्रारीची दखल घेण्याऐवजी बाहेरून येणाऱ्या वजनदार फोनची दखल घेऊन सामान्यांची कुचंबना करण्याची कार्यपद्धत ही निषेधार्थ आहे याला कुठेतरी आळाबंदा घालण्याची गरज आहे.सध्या मसूर पोलीस स्टेशनमध्ये ठोस कारवाईचा अभाव आहे तक्रारदारांना न्याय मिळत नसल्याने त्यांच्यात निराशा आहे एवढी पोलीस यंत्रणांची फौज दिमतीला असताना घोड नक्की कुठे पेंड खाते...? याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घ्यावी किंबहुना मसूर पोलीस स्टेशनच्या कारभाऱ्यांनी आपल्या कार्यपद्धतीत बदल करून मसूर पोलीस स्टेशन खऱ्या अर्थाने जनतेला न्याय देण्याचे केंद्र आहे अशी प्रतिमा व विश्वास जनतेत निर्माण करावा अशी मागणी मसूर पंचक्रोशीतील जनता करत आहे..!

## गौतम बुध्द..

बोधी वृक्षा खालती
गौतमा प्राप्त सिध्दी
दिव्यज्ञानाचीप्रचिती
प्रखर जाहली बुध्दी
दिव्यज्ञान हे निर्वाण
म्हणती तया संबोधी
वास्तव्याने सिध्दार्थां
भाग्यवान वृक्ष बोधी
तथागतास मिळाली
बुध्द अद्भुत उपाधी
बौध्द धम्म स्थापना
जगता अमूल्य संधी
अवगत बौध्द धम्मा
जळून पडली व्याधि
विचारकरता आचार
आत्म्याची होईशुध्दी
अहंकार गेला गळून
कळलेचं नाही कधी
सद् मार्गावर आणले
घोर अघोर अपराधी
ज्ञान प्रकाशा न्हाही
माणसे अगदी साधी
जाणे धम्माची अंगे
शील प्रज्ञा समाधि

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# संपादकीय

## केंद्र सरकारचे धोरण

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत – पाकिस्तान वादात मध्यस्थी केल्यानंतर देशातील अनेक विचारवंत, विरोधी पक्षातील नेत्यांनी मोदी सरकारला लक्ष्य केले असल्याचे दिसून आले. भारत आणि पाकिस्तान यांच्या ७ मे नंतर उद्भवलेली युद्धजन्य परिस्थिती आता निवळली असून दोन्ही देशांच्या सैन्य दलाने शस्त्रसंधी केल्याचे दिसून आले. भारताने युद्धविरामाची घोषणा केली, पण ऑपरेशन सिंदूर सुरूच राहणार असल्याचे म्हटले आहे आहे. दहशतवाद्यांना कुठल्याही परिस्थितीत उत्तर दिले जाईल, भारताकडून दहशवाद्यांविरुद्धची लढाई सुरूच राहिल असे भारतातर्फे ठणकावून सांगण्यात आले आहे. मात्र, भारत–पाकिस्तान यांच्यातील सैन्य दलाच्या कारवाईंना विराम देण्यात आल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चर्चेत आले आहेत. कारण, भारत आणि पाकिस्तान यांच्यात आता शस्त्रसंधी झाली, अशी घोषणा सर्वप्रथम डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. विशेष म्हणजे अमेरिकेच्या मध्यस्थीने हा मार्ग काढण्यात आल्याचे सांगत त्यांनी दोन्ही देशांचे आभारही मानले. त्यानंतर, केंद्रातील मोदी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. भारत–पाकिस्तान यांच्यातील प्रश्नात अमेरिकेचा काय संबंध ? असा सरळ सवाल उपस्थित झाला आहे. याबाबत, आता माजी संरक्षणमंत्री शरद पवार यांनीही परखडपणे भाष्य करत म्हटले आहे की, भारत – पाकिस्तान यांच्यात डोनाल्ड ट्रम्प यांची मध्यस्थी योग्य नाही. शिमला करारानुसार दोघांमधील वादात तिसरा कोणीही मध्यस्थी करू शकत नाही. असे असताना शिमला कराराचे काय झाले ? असा सवाल पवार यांनी विचारला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्यानंतर देशातील अनेक विचारवंत, विरोधी पक्षातील नेत्यांनी मोदी सरकारला लक्ष्य केले. तसेच, काँग्रेसकडून १९७१ सालच्या युद्धाचे उदाहरण देत, इंदिरा गांधी होना आसान नही... अशी बॅनरबाजी करण्यात आली. तर, मोदी सरकारने युद्धजन्य परिस्थितीत अशी माघार का घेतली, अमेरिकेचा दबाव आहे का? असा सवालही विरोधकांनी विचारला आहे. शिमला करार हा भुत्तो आणि इंदिरा गांधी यांच्यात झाला होता. त्यात आमच्या देशाचे मुद्दे आम्ही सोडवू, आमचा विषय आम्ही सोडवू, इतरांनी त्यात नाक खूपसण्याचे कारण काय? अशा शब्दात शरद पवारांनी अमेरिकेच्या हस्तक्षेपावर परखडपणे आपली भूमिका मांडली. आपल्या घरगुती वादात तिसऱ्या राष्ट्राचा हस्तक्षेप चालणार नाही. ही पहिलीच वेळ आहे, अमेरिकन ॲथोरिटीने जाहीरपणे सांगितले, हे ठीक नाही, अशा शब्दात शरद पवारांनी भारत – पाकिस्तान युद्धविरामानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या ट्विटवर प्रतिक्रिया दिली. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भाषण नुकतेच रात्री ८ वाजता झाले. त्यांनी देशाला संबोधित केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणात अमेरिकेच्या हस्तक्षेपाबाबत माहिती देणे महत्वाचे आहे. याबाबत केंद्र सरकारने विशेष अधिवेशन बोलवायला हरकत नाही, असे वाटते.

काँग्रेस नेते व विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी युद्धजन्य परिस्थितीवर विशेष अधिवेशन बोलवण्याची मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे केली आहे. त्यावर, शरद पवारांनी भूमिका मांडली आहे. विशेष अधिवेशन बोलवायला हरकत नाही पण त्यात किती माहिती दिली जाईल हे सांगता येत नाही. संरक्षणाशी संबंधित अनेक महत्त्वाची माहिती देता येत नाही, त्यामुळे त्या गोपनीय ठेवाव्या लागतात. सेशन बोलवायचे असेल तर बोलवा. त्यापेक्षा सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलवून माहिती दिली गेली पाहीजे. संरक्षण अधिकारी यांना बोलावून त्यांच्याकडून माहिती दिली गेली पाहीजे, काय स्थिती आहे आपण काय केले आहे याची माहिती दिली पाहिजे, असे राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी म्हटले आहे. तसेच सिंदूर ऑपरेशननंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी जाहीरपणे माहिती देत नाही. आता तरी अमेरिकेच्या मध्यस्थी करण्यासाठी कोणी बोलावले होते, हे नेमके स्पष्ट होत नाही. कारण यातून भारताचे धोरण कचखाऊ आहे, असा जगभर संदेश जाऊ शकतो.

देशात सिंदूर ऑपरेशनबद्दल सोशल मीडियावर धुमाकूळ सुरू झाला आहे. भारताने पाकिस्तानातील १०० दहशतवादी मारले, दहशतवाद्यांचे तळ उडवले असे म्हटले तरी त्याबाबत योग्य तो पुरावा दिलेला नाही. आता नुकत्याच हाती आलेल्या बातमीनुसार पाकिस्तानातील १४० लोक मारले गेले असे म्हणण्यात येत आहे. सिंदूर ओपरेशनचा मोठा गाजावाजा केंद्र सरकारने केला, परंतु त्याची फलनिष्पत्ती काय झाली, हे दिसून आलेले नाही. सर्वसामान्य लोकांना राष्ट्राबद्दल अभिमान वाटतो, हे खरेच आहे. परंतु सिंदूर ऑपरेशनचा राजकीय फायदा केंद्र सरकारने घेऊ नये, असे वाटते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संबोधित करताना म्हटले की, भारताची तिन्ही सैन्यदले यापुढे पाकीस्तानविरोधात सज्ज राहतील. भारतात दहशतवादी हल्ला झाल्यास भारत यापुढे जशास तसे उत्तर देईल. भारत हा नेहमीच दहशतवादाविरोधात आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये मारलेल्या दहशतवाद्यांना श्रद्धांजली देण्यास पाकिस्तानमधील अनेक मोठे नेते, तेथील सैन्य दलाचे प्रमुख होते. हाच एक पाकिस्तानविरोधात, दहशतवाद पोसल्याचा मोठा पुरावा आहे. पाकिस्तानी सैन्य व पाकिस्तानी सरकार ज्याप्रमाणे दहशतवाद पोसतात, त्याप्रमाणेच पाकिस्तानचा नाश होईल. दहशतवाद आणि प्रेम शांतता एकत्र नांदू नाहीत. पाकिस्तानशी आता जी चर्चा होईल, ती थेट सीमा रेषेवर होईल. भारताने खूप संयम दाखवला, परंतु आता यापुढे प्रत्येक हल्ल्याला उत्तर मिळेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संबोधित करताना म्हटले की, भारताला सशक्त करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. मोदींनी पाकिस्तानाला खडे बोल सुनावले. परंतु मोदींनी अमेरिकेच्या मध्यस्थीबाबत काहीच वक्तव्य केले नाही. मोदींचे भाषण हे भावनशील होते. ऑपरेशन सिंदूर यावरच मोदी अपेक्षेप्रमाणे जास्त बोलले. परंतु विरोधकांनी विचारलेल्या प्रश्नाला मोदी यांनी कुठलेच उत्तर दिले नाही. यापुढे अमेरिका भारत – पाकिस्तान संबंधात मध्यस्थी करू शकते, हा धोका आहे. भारत आणि पाकिस्तानातील दहशतवादाचा प्रश्न दोन्ही देशांनीच सोडवायचा, असे शिमला करारात म्हटले आहे. परंतु अमेरिकेची मध्यस्थी झाल्याने हा करार मोडला की शिमला करारात काही बदल झाला ? असा प्रश्न व्यक्त करण्यास हरकत नाही.

# काँग्रेसची दुरवस्था

लोकसभा निवडणुकीवेळी राज्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विजयाची जबाबदारी स्वीकारली होती. त्याप्रमाणे साहजिकच विधानसभा निवडणुकीच्या पराभवाची जबाबदारी पटोले यांनी स्वीकारली. त्यावेळीही राज्यातील काँग्रेस अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले होते. महाराष्ट्रात सध्या काँग्रेसचे खूप कमी १६ आमदार आहेत. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला यश मिळाले नाही. त्यानंतर पक्षश्रेष्ठींनी पटोलेनंतर राज्याच्या प्रदेशाध्यक्ष पदावर हर्षवर्धन सपकाळ यांनी नियुक्ती केली आहे. सपकाळ यांनी संयमीपणे काँग्रेसचे नेतृत्व करण्यास सुरुवात केली आहे. ते सत्ताधारी पक्षावर थेट टीका न करता योग्य त्या पद्धतीने उत्तरे देत आहेत. म्हणजेच सपकाळ यांनी कुणाचा रोष ओढवून घेतलेला दिसत नाही. त्यांनी काँग्रेसचा आब महाराष्ट्रात तरी राखल्याचे दिसत आहे. काँग्रेसच्या परणारेला शोभणारा प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्राला मिळाल्यामुळे काँग्रेस पुन्हा ग्तवैभव प्राप्त करू शकेल असे दिसते. राजाकरणात काही गोष्टी साध्य होण्याकरता वेळ जावा लागतो. काळ हे त्यावरील योग्य उत्तर आहे. अनेकजण महाराष्ट्रात सत्तेवर आले, परंतु काँग्रेसने पुन्हा उभारी घेतली हा इतिहास आहे. इतिहासाला खूप महत्व आहे आणि इतिहासाला कमी लेखून चालणार नाही. खळखळ करणारे पाणी एका जागेवर रहात नाही, पण शांत डोहातील पाण्याचा अंत लागत नाही, हे खरेच आहे. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला अपयश मिळाले हे वास्तव आहे. नाना पटोले याना प्रदेशाध्यक्षावरून पायउतार करा, अशी मागणी काँग्रेसमधून होत होती. त्यानंतर काँग्रेस श्रेष्ठींनी ठाम निर्णय घेत हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती प्रदेशाध्यक्षपदी निवड केली हे बरेच झाले.



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

राज्यातील काँग्रेसचे अपयश, कारणे आणि चुका तसेच नेतृत्वाबद्दल जाणून घेण्यासाठी राज्याचे प्रभारी रमेश चेनिथला नागपूरला आले होते. त्यावेळी काँग्रेसमध्ये बदल होईल, अशी अपेक्षा होती. राज्यात काँग्रेसची झालेली दयनीय अवस्था पाहता नव्याने पक्षउभारणी करणे, काँग्रेसला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्याचे आव्हान काँग्रेस नेतृत्वासमोर होते. काँग्रेसमध्ये सध्या गटबाजी सुरू आहे, हेवेदावे आहेत. या पार्श्वभूमीवर पक्षांमधील कार्यकर्त्यांची कार्यशाळा घेणे, सातत्याने त्यांना एकत्र ठेवणे आणि पक्षाचे विचार त्यांच्यात रुजवणे महत्वाचे वाटते. काँग्रेस नेमके हेच संयमीपणे करत आहे.

विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे बडे नेते पराभूत झाले. याचे कारण म्हणजे पक्षात असलेली गटबाजी होय. इव्हीएममधील घोटाळा कारणीभूत आहे, असे म्हटले गेले. परंतु त्याबाबत कुणाकडेही ठोस पुरावा नाही, असेच दिसते. त्यामुळे यावर बोलणे उचित होणार नाही. गटबाजीमुळे काँग्रेसचे वाटोळे झाले. देशभरात काँग्रेसची जी वाताहत होत आहे ती पाहूनही त्यातून कुठलाही धडा न घेण्याचे धोरणच जणू काँग्रेसजनांनी स्वीकारले आहे. याबाबतीतले चित्र दिल्लीपासून गल्लीपर्यंत सारखेच आहे. समाज माध्यमातून पक्षाची सत्यनिष्ठ भूमिका मांडण्यासोबतच काँग्रेस कमी पडत आहे.

राज्यात अनेकवेळा काँग्रेसची गटबाजी पुन्हा चव्हाटयावर आली. महाराष्ट्रातील काँग्रेसमध्ये सक्रियता नसल्याचे दिसून आले आहे. जसे भाजपा समाजमाध्यमावर सक्रिय आहे त्याप्रमाणे काँग्रेस सक्रिय दिसत नाही. तसेच काँग्रेसची शिबिरे होत नाहीत. काँग्रेसचे कार्यकर्ता शिबिर सातत्याने होणे आवश्यक आहे. कारण त्यामध्ये कार्यकर्त्यांना मार्गदर्शन मिळते आणि कार्यकर्ते सक्रिय होतात आणि पक्षही सक्रिय होतो. काही वर्षांपूर्वी नागपुरातील काँग्रेसचे स्थानिक पातळीवरील नेते या शिबिरात सहभागी झाले नव्हते. त्यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व ज्येष्ठ नेते विलास मुत्तेमवार हेही उपस्थित होते. परंतु विशाल मुत्तेमवार यांनी शिबिर आयोजित केल्यामुळे दुसरा गट नाराज झाला होता. त्या गटातील कार्यकर्ते, नेते आलेच नाहीत. असे प्रकार कुठे होऊ नयेत यासाठी




काँग्रेस नेत्यांनी प्रयत्न केला पाहिजे. काँग्रेसमध्ये गटबाजी करणाऱ्या नेत्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. तरच काँग्रेस वाचेल असे दिसते. काँग्रेसचा ऱ्हास होण्याची अनेक कारणे आहेत, त्यापैकी गटबाजी हे एक प्रमुख कारण दिसते. काँग्रेसला गटबाजीमुळे पोखरल्याने काँग्रेस आज दयनीय अवस्थेत असलेले दिसून येत आहे.

काँग्रेस गटतटांमध्ये विभागल्याने काँग्रेसचे सर्वात जास्त नुकसान झाल्याचे दिसून येते. काँग्रेसचे अनेक नेते आपापल्या कोषात मग्न असतात, काहीजण लढाई होण्यापूर्वीच जहाजातून पळून गेले. काँग्रेसकडे सध्या दिग्गज नेते नाहीत, परंतु पक्षाचे विचार काँग्रेसला वाचवू शकतात, एवढी तकाड काँग्रेसच्या विचारांत आहे. स्थानिक पातळीवरच गटबाजी असेल तर काँग्रेसचे कार्यक्रम यशस्वी कसे होणार यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच काँग्रेस जर एकजूट राहिली नाही तर येत्या अनेक निवडणुकांत काँग्रेसचे पानिपत होऊ शकते. काँग्रेसने एकजुटीने त्यांची भूमिका मांडण्याची गरज आहे. ही भूमिका मांडताना पक्षातील गटबाजी दिसून येता कामा नये तसेच काही नेत्यांच्या इगोला आवर घातला पाहिजे तरच काँग्रेसचे भवितव्य ठीक राहणार आहे. अन्यथा महाराष्ट्रामध्ये एकेकाळी नंबर वन असलेली काँग्रेस आता चौथ्या स्थानावर आलीच आहे. या स्थानावरून पूर्वीचे वैभव गाठायचे की गाळातच राहायचे हे काँग्रेसच्या नेत्यांनी ठरवले पाहिजे.

काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असून या पक्षाला सव्वाशे वर्षांची परंपरा आहे. या पक्षामध्ये अनेक दिग्गज नेत्यांनी आपली नेतृत्वाची चुणूक दाखवून दिली आहे तसेच देशाचे प्रतिनिधित्व केले आहे. पूर्वीच्या अनेक दिग्गजांनी काँग्रेस पक्षासमोर अनेक आदर्श ठेवले. त्यावेळी काँग्रेसमध्ये गटबाजी जास्त प्रमाणात फोफावली नव्हती. परंतू आजची परिस्थिती वेगळी आहे. काँग्रेसमध्ये गटबाजी, मतभेद, कलह सुरू आहेत. याचाच राजकीय फायदा भाजप पक्ष घेत आहे. काँग्रेसला अजूनही आपल्यामध्ये काही सुधारणा करता आलेल्या नाहीत हे विशेष होय. कारण त्या जर सुधारणा केल्या असत्या तर आज काँग्रेसचे गतवैभव परत दिसून आले असते. राज्यांमध्ये काही शिबिरेही आयोजित केली जातात. या शिबिरांचा उद्देश असा असतो की काँग्रेसमधील कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी आपल्या चुकांमधून नवीन शिकावे आणि काँग्रेसला सक्रिय करावे. परंतु गटतटांमध्ये विभागलेल्या नेत्यांना हे कसे समजणार हा मोठा प्रश्न आहे. आपली पदे राखायची, इतरत्र लक्ष द्यायचे नाही ही संकुचित प्रवृत्ती काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये बळावली आहे. त्यामुळे काँग्रेसला मोठ्या पातळीवर घेऊन नेणारा नेता महाराष्ट्राला मिळाला नाही हे महाराष्ट्राचे दुर्दैव होय. काँग्रेसने पक्षातील छोट्या–मोठ्या घटनांमधून बोध घेण्याची गरज आहे. अन्यथा काँग्रेसची परिस्थिती जैसे थे राहील यात शंका नाही.

# भरकटलेली तरुणाई विनाशाच्या उंबरठ्यावर



**बुध्दभूषण कांबळे**
**अहमदपूर, मो.७४९८७१५६६१**

प्रत्येक देशाची ताकद ही त्या देशातील तरुणांवर अवलंबून असते. ज्या देशात तरुणांची संख्या जेवढी अधिक असते, तेवढी त्या देशाची ताकद वाढत असते. कारण तरुण हेच देशाचे भवितव्य व आधारस्तंभ असतात. आणि तेच खऱ्या अर्थाने देशाची प्रगती आणि विकास साधू शकतात. आपल्या लाडक्या भारत देशाला प्रगतीपथावर नेऊन या जगाची महासत्ता बनवू शकतात. फक्त आपल्या भारतीय तरुणांनी ही गोष्ट मनावर घेऊन तशी वाटचाल करायला हवी. कारण जगात सर्वात मोठा तरुणांचा देश म्हणून भारताला ओळखले जाते. भारतात इतर देशांच्या तुलनेत तरुणांची संख्या सर्वात जास्त आहे. आणि हे तरुण देश विकासात जेवढे सक्षम व प्रबळ असतील तेवढा देश सुद्धा बलशाली व मजबूत बनतो. पण हे तरुण नुसते प्रबळ व बलशाली असून चालणार नाही तर ते देशाला विकसनशील करण्यात किती क्रियाशील व कार्यक्षम आहेत. हे अगोदर तपासले पाहिजे. त्यानुसार जगातील देशांच्या विकासाचा आलेख ठरवता येतो. जर एखाद्या देशातील तरुण शैक्षणिक क्षेत्राच्या बाहेर जाऊन व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकले तर त्या देशाच्या विकासाचा वाढता आलेख घसरायला वेळ लागणार नाही. कारण हेच व्यसनाधीन तरुण देशाच्या प्रगतीला बाधा ठरू शकतात. केवळ देशात तरुणांची संख्या जास्त असून चालणार नाही तर त्या देशातील तरुण हे उच्चशिक्षित, निर्व्यसनी, कार्यक्षम आणि सर्व क्षेत्राची परिपूर्ण जाण असणारे जाणकार असले पाहिजेत. म्हणजे त्या देशाचा विकास व्हायला वेळ लागणार नाही. पण आजकालची तरुणाई शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर जाऊन, इतरत्र कुठेही भरकटत चालली आहे. आणि स्वतःला व्यसनाच्या विखारी विळख्यात ओढून घेत आहे. व्यसनाच्या बाबतीत आपला भारत देश इतर देशांच्या तुलनेत फार पुढे गेला आहे. आणि व्यसन करण्यात आमची युवा पिढी आघाडीवर आहे. अगदी नव्याने मिसरूड फुटू लागलेले यंग पोट्टे देखील व्यसन करण्यात फार पुढे गेले आहेत.


शालेय विद्यार्थी सुद्धा शाळेत जाऊन गुटखा, तंबाखू व सिगारेट पीत आहेत. काही काही विद्यार्थी तर शाळेत दारूच्या बॉटल घेऊन जात आहेत. आणि खुशाल वर्गात बसून पीत आहेत. म्हणजे शालेय जीवनापासूनच बहुतांश विद्यार्थी व्यसनाच्या आहारी गेलेले दिसत आहेत. ज्या वयात खूप खूप अभ्यास व चिंतन करायचे सोडून, शरीरयष्टी मजबूत ठेवायचे सोडून आणि स्वतःला घडवायचे सोडून आमचे विद्यार्थी जर शालेय जीवनापासूनच वाईट व्यसनाच्या विळख्यात अडकत असतील तर मग आपल्या देशाची प्रगती होणे शक्य आहे का? देशाला जगाची महासत्ता बनवणे शक्य आहे का? आपला देश मजबूत, बलशाली व भक्कम होईल का? या प्रश्नांची उत्तरे स्वतःला विचारून आमच्या विद्यार्थ्यांनी आत्मपरीक्षण करायला हवे. असे मला वाटते. हे विद्यार्थी कसेबसे दहावीला काठावर पास होऊन, कॉलेज जीवनात प्रवेश करतात आणि शिक्षणाच्या नावाखाली आई–वडिलांचे खूप खूप आर्थिक शोषण करतात. आई वडिलांना वाटते की, आपला मुलगा खूप खूप शिकेल व नोकरीला लागेल, म्हणून ते आपल्या मुलाला शहरी भागात शिकायला ठेवतात आणि त्यांना खूप खूप कष्ट करून पैसा पाठवतात. पण आमचे विद्यार्थी आई–वडिलांनी पाठवलेला पैसा शिक्षणासाठी न लावता ढाब्यावर किंवा दारूच्या दुकानावर उधळतात. हे चित्र सध्या शहरी भागात सर्रास पाहायला मिळत आहे. शिक्षणाच्या नावाखाली आई–वडिलांचे रक्त पिऊन, कुठेही भरकटत जाणारी तरुणाई स्वतःला विनाशाच्या उंबरठ्यावर घेऊन जात आहे. वाईट व्यसनाच्या आहारी जाऊन नकळत स्वतःला मृत्यूच्या दाढेत ओढत आहे. शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर जाऊन स्वतःचे जीवन बरबाद करून घेत आहे. म्हणूनच की काय? आजकाल बहुतांश विद्यार्थी दिशाहीन होऊन अंधारात चाचपडत आहेत. व्यसनाचे वाढते प्रमाण आणि शैक्षणिक पात्रतेचा अभाव पाहून आजकालच्या मुलांना कोणी मुलगी पण द्यायला तयार होत नाही. गावागावांत अगदी पन्नाशीत प्रवेश केलेल्या अविवाहित पुरुषांची संख्या प्रचंड वाढली आहे. एकतर बेकारीचा शिक्का आणि व्यसनाचा बट्टा लागलेल्या तरुणांना मुलगी द्यायला कोण तयार होईल? वेळेवर लग्न होत नाही म्हणून बरेच तरुण तरुणी नैराश्यात जाऊन स्वतःचे जीवन संपवत आहेत. हे आपण सोशल मीडियावर, वर्तमानपत्रात आणि टीव्हीवर रोज पाहत आहोत. खरेतर ही तरुणाई स्वतःला बरबाद करण्यात, स्वतःच कारणीभूत आहे. कारण अगोदर शालेय जीवनापासून लागलेली वाईट व्यसनाची सवय आणि कॉलेज जीवनात व्यसनाचे वाढते प्रमाण यामुळे बहुतांश विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर पाणी पडले आहे. आणि त्यांची शैक्षणिक लिंक तुटल्यामुळे ते इतरत्र कुठेही भरकटत जाऊन स्वतःचा विनाश करून घेत आहेत. आपल्याच हाताने स्वतःच्या पायावर दगड मारून, स्वतःला विनाशाच्या खाईत लोटत आहेत. म्हणूनच आजकालच्या तरुण पिढीचे भवितव्य खूप धोक्यात आहे. आणि तरुण पिढीचे धोक्याचे भवितव्य देशाला घातक ठरू शकते. हे आपण लक्षात घ्यायला हवे. ज्या देशातील तरुण व्यसनाला मुठ माती देऊन शैक्षणिक क्षेत्रात मन लावून अभ्यास करतात ते तरुण देशाच्या विकासाला हातभार लावतात. अमेरिका, जपान व चीन हे प्रगत राष्ट्र जगाची महासत्ता म्हणून ओळखले जातात. हे तिन्ही प्रगतशील देश बुद्धांच्या तत्त्व प्रणालीवर चालणारे आहेत. म्हणूनच या देशात व्यसनाचे प्रमाण खूप कमी आहे. आणि अभ्यासाचे प्रमाण जास्त आहे. इथे अंधश्रद्धेला कसलाच थारा नाही. म्हणूनच या देशांचा पूर्णपणे विकास झालेला आहे. आपला भारतही इतर देशांपेक्षा काही कमी नाही. कारण आपला देश प्रजासत्ताक राष्ट्र आहे. या देशात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वात श्रेष्ठ व पवित्र अशा सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या भारतीय संविधानाची निर्मिती करून समस्त भारतीयांना समता, स्वातंत्र्य व बंधुता बहाल केली आहे. गरीब असो की श्रीमंत प्रत्येकाला एक आणि एकाच मताचा अधिकार देऊन हुकूमशाहीला नाकारले आहे. आणि लोकशाहीला जवळ केले आहे. जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश म्हणून भारताकडे संपूर्ण जग आदराने बघत आहे. आपल्या भारतीय संविधानाची प्रेरणा घेऊन इतर देश आपल्या देशाला विकसनशील करू पाहत आहेत. हे आमच्या भारतीय तरुणांनी ओळखायला हवे. आपल्या भारतीय संविधानाची प्रेरणा घेऊन इतर देश त्यांच्या देशाचा चौफेर विकास करत असतील तर मग आपण प्रजासत्ताक भारताचे सुजान लोक एवढे मागे का आहोत? या प्रश्नाचा विचार केला तर असे म्हणता येईल की, आमच्या युवा पिढीने इतरत्र कुठेही भरकटत न जाता आपल्या भारतीय महापुरुषांचा आदर्श घेऊन, व्यसनाला मूठ माती द्यावी आणि खूप खूप शिक्षण शिकावे, स्वतःच्या पायावर उभे राहून, सामाजिक क्रांती करावी... आपोआपच देशाचा कायापालट होईल...

# पाकिस्तानने आता तरी शुद्धीवर यावे: शिराज शिकलगार

***विटा /प्रतिनिधी:***

पहलगाम मधील जी घटना घडली ज्या निष्पाप पर्यटकावर दहशतवाद्यांनी जो गोळीबार केला अचानक हल्ला केला पहलगाम पर्यटकांवर गोळीबार करणाऱ्या दहशतवादी संघटना आणि त्यांना पाठिशी घालणाऱ्या पाकिस्तानला भारतीय लष्कराने चांगलाच धडा शिकवला. लष्कराने केलेला हल्ला योग्यच आहे. पाकिस्तान सरकारने आता तरी शुद्धीवर यावे. दहशतवादी संघटनांना पाठीशी घालण्याचे उद्योग बंद करावेत, असे सडेतोड उत्तर सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहरातील खानापूर तालुका विटा शहर दैनिक प्रीतिसंगमचे प्रतिनिधी व कोविड योद्धा व सतर्क नागरिक स्वयंसेवी संस्था, महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र शिराज शिकलगार यांनी पाकड्यांना सडेतोड उत्तर दिले आहे.

यावेळी शिकलगार म्हणाले, पाकव्याप्त काश्मीर असो, अथवा पाकिस्तानमधील कुठलेही शेहर असो. ज्या ज्या ठिकाणी दहशतवाद्यांचे अड्डे आहेत. ते उध्वस्त करावेत. अतिरिक्यांचा खात्मा



करूनच लष्कराने ही मोहीम थांबवावी. त्याशिवाय हे पाकिस्तान शुद्धीवर येणार नाही. माझी लष्कर जवानांना हात जोडून विनंती आहे, जिथे जिथे हे दहशतवादी दिसतील तिथे तिथे त्यांच्यावर असाच गोळीबार नव्हे तर चिंधड्या करा.

# 'ओव्या दिनांच्या' :आपल्या जाणिवांचा आणि मूल्यांचा दिनविशेष

**दिलीप भोसले**
**सीईओ दिभो सन्स**
**भारतीय चित्रपट लेखक दिग्दर्शक**

आजच्या घाईगर्दीच्या, तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या जगात माणूस दिवसेंदिवस यांत्रिक होत चालला आहे. जीवनातील साधेपणा, संवेदना आणि संस्काराच्या जागा आता कृत्रिमतेने व्यापल्या जात आहेत. अशा काळात एखादे पुस्तक जिथे कवितांच्या माध्यमातून आपला इतिहास, संस्कृती, समाज आणि माणूसपणाचा धागा पकडते, त्या संग्रहाचं मोल शब्दात मांडणं कठीण आहे. सुधीर शेरे लिखित 'ओव्या दिनांच्या' हा असा एक वेगळा आणि ठसा उमटवणारा कवितासंग्रह आहे, जो केवळ साहित्यप्रेमींसाठी नव्हे, तर शिक्षण, संस्कार, सामाजिक जाणीव आणि मूल्य–शिक्षण यांची आवड असणाऱ्या प्रत्येकासाठी एक मौल्यवान ठेवा आहे.

सण–वार, जयंत्या, पुण्यतिथ्या, संस्था स्थापना दिवस, जागतिक आरोग्य दिन, पर्यावरण दिन, महिला दिन, मानवाधिकार दिन, विज्ञान दिन हे सर्व दिवस आपल्याला कोणत्या ना कोणत्या ऐतिहासिक, सामाजिक किंवा वैज्ञानिक मूल्यांची आठवण करून देतात. मात्र ही माहिती केवळ कॅलेंडरात मर्यादित राहते, शालेय भाषणापुरतीच उरते, परंतु तिचं खरं मोल कधीच जाणवलं जात नाही. म्हणूनच सुधीर शेरे यांनी हीच माहिती कवितेत ओवली. त्यांनी या 'दिनविशेष' दिनांकांना केवळ माहितीपुरते न पाहता, त्यांचा ऐतिहासिक, सामाजिक व मूल्यदृष्टिकोनातून अभ्यास केला. आणि त्यानंतर ते रूपांतरित केलं एक सुसंस्कृत, प्रबोधनपर कवितासंग्रहात. 'ओव्या दिनांच्या' मध्ये. ही एक अत्यंत विचारपूर्वक व मनापासून साकारलेली साहित्यिक तपश्चर्या आहे.

सुधीर शेरे हे शिक्षक. शिक्षकी पेशा ही केवळ ज्ञान देण्याची भूमिका नसून, संस्कारांची शिदोरी बांधणारा एक समाज निर्माता असतो. त्यांच्या या भूमिकेचा अनुभव त्यांच्या लेखनात ठायी ठायी दिसून येतो. त्यांच्या कवितांचा जन्म झाला तो शाळेतील कामकाजाच्या निमित्ताने. अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या विविध दिनविशेषांच्या माहिती संकलनातून.

ते म्हणतात, प्रत्येक वेळी ही माहिती परिपूर्ण, पण संक्षिप्त हवी असते. आणि कविता स्वरूपात असेल तर जास्त परिणामकारक ठरते. या शिक्षकाच्या अंतःकरणातून स्फुरलेले विचार, कालांतराने विद्यार्थ्यांच्या, सहकाऱ्यांच्या पसंतीस उतरले आणि पुढे पुस्तक म्हणून प्रकाशित होण्याइतपत परिपक्व झाले.

या संग्रहातील प्रत्येक कविता आष्टाक्षरी ओवी छंदात बांधलेली आहे. चार चरणांची एक रचना आणि त्यातही पाच कडवी, हा शिस्तबद्ध बांधणीचा नमुना आहे. ही शिस्त केवळ छंदामधली नाही, तर विषय मांडणीतलीही आहे. प्रत्येक रचनेत दिनविशेषाचं स्वरूप, त्यामागचा ऐतिहासिक संदर्भ, त्याचं सामाजिक महत्त्व, वर्तमानाशी नातं आणि संदेशरूप सादरीकरण असा एक अभ्यासपूर्ण क्रम पाळण्यात आलेला आहे.

ही रचना पद्धती केवळ सौंदर्यशास्त्रीय नाही, तर ती संस्कारशास्त्राची एक जबाबदारीही पेलते. अशा प्रकारे 'ओव्या दिनांच्या' या संग्रहातून माहिती, मूल्ये आणि संवेदना या तीन अंगांचा एकत्रित प्रवास आपल्यासमोर उभा राहतो.

सुधीर शेरे यांनी केवळ भारतापुरता मर्यादित विषय घेतला नाही. त्यांनी युनेस्को घोषित जागतिक दिन यांची निवड केली. ज्यामध्ये मानवता, विज्ञान, पर्यावरण, दुर्बल घटक, आरोग्य, सेवा आणि शांतता हे मूलभूत मानवी मूल्ये केंद्रस्थानी आहेत. अशा निवडीमुळे या संग्रहाला केवळ स्थानिक नसून जागतिक विचारांची कवितात्म मांडणी मिळते.

त्यातही त्यांनी समन्याय, समदृष्टी आणि सममूल्य हे त्रिसूत्र पाळलं आहे. ज्यामुळे प्रत्येक विषयाला समान महत्त्व मिळतं. ही गोष्ट त्यांच्या लोकशाहीवादी, समतावादी विचारधारेचं प्रतिक आहे.

जिथे माहिती तांत्रिक झाली, तिथे कधी कधी ओवीची गेयता कमी झाली. पण या त्रुटीबद्दल लेखकाने अत्यंत प्रामाणिकपणे हा दोष मी पदरात घेतो अशी कबुली दिली आहे. ही नम्रता त्यांच्या साहित्यिक प्रामाणिकतेचं प्रतीक आहे.

त्याचप्रमाणे, 'राष्ट्रीय युवा दिन' या कवितेत एक कडवं अधिक झालं पण तेही त्यांनी अपवाद म्हणून स्पष्ट केलं. स्वतःच घालून घेतलेले बंधन पाळताना त्यांनी अचूकता व काटेकोरता राखली. ही गोष्ट त्यांच्या साहित्यप्रेमाचं आणि तपश्चर्येचं लक्षण आहे.

'ओव्या दिनांच्या' या संग्रहात आपल्याला फक्त कवी दिसत नाही, तर संवेदनशील शिक्षक, सामाजिक भान असलेला विचारवंत आणि एक संस्कार करणारा संस्कृती–वाहक असा त्रिसंवेदनशील व्यक्तिमत्त्वाचा संगम दिसतो. हे पुस्तक म्हणजे कवितेच्या माध्यमातून घडवलेली मुल्यशिक्षणाची नवी वाट आहे.

या संग्रहाचा प्रत्येक दिवस, प्रत्येक कविता म्हणजे एका नव्या उजेडाची खिडकी आहे. जिथून आपण स्वतःच्याच आयुष्याच्या, समाजाच्या आणि संस्कृतीच्या नव्या अर्थाकडे पाहू शकतो.

'ओव्या दिनांच्या' या कवितासंग्रहात कवितेला माहितीचा अर्थ, संस्काराचा आधार आणि सामाजिक संवेदनांचा स्पर्श लाभलेला आहे. ही कविता म्हणजे फक्त काव्य न राहता, ती एक सामाजिक दस्तऐवज, शिक्षणसंहिता आणि मानवमूल्यांची पाठशाळा आहे.




हे पुस्तक वाचताना प्रत्येकाला आपल्या शिक्षकाचे, शाळेतील भाषणाचे, समाजकार्याच्या उपक्रमाचे, आपल्या आजूबाजूच्या माणसांचे स्मरण होईल. आणि एकदा का ही आठवण जागी झाली की ही कविता तुमचं मन अधिक संवेदनशील आणि समजूतदार करेल.

'ओव्या दिनांच्या' हे केवळ कवितांचं पुस्तक नाही, तर ते आपल्या जाणीवांचा आणि मूल्यांचा दिनविशेष आहे.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर–कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 ✻मुख्य कार्यालय:– गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड – ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, ✻ सातारा कार्यालय:– संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:–९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# साताऱ्याच्या कंदी पेढ्यानंतर विटयाच्या खव्याच्या पेढ्याला मागणी

## १०वी १२ वी चा निकाल आणि पेढे खरेदीसाठी विद्यार्थ्यांसह पालकांची झुंबड

**विटा/शिराज शिकलगार: -**

विटा शहरातील विटा – मायणी रोडवरील नवी भाजी मंडईतील सुप्रसिद्ध कोरे स्वीट मार्ट व गांधी चौकातील कोरे स्वीट मार्ट ही दुकाने गेल्या दोन पिढ्या सातत्याने प्रामाणिकपणे प्रसिद्ध आहे. आता तिसरी पिढी किशोर कोरे. त्यांचे बंधू विनायक कोरे हे सध्या हा व्यवसाय चालवत आहेत. साताऱ्याच्या पेढ्यानंतर आता विट्याचा खाव्याचा पेढा म्हणून प्रसिद्धी व नाव रूपात आहे.

दहावी आणि बारावीचा निकाल लागला की, विटेकरांची पावले कोरे स्वीट मार्ट कडे पेढे खरेदी करण्यासाठी वळतात आणि निकालाचा आनंद साजरा करण्यासाठी पाल्याबरोबर पालकांचीही पेढे



खरेदी करण्यासाठी झुंबड दिसून येते. सातत्याने एकच कॉलिटी आणि एकच दर्जा विश्वासनीय माल म्हणून खव्याचे सर्व पदार्थ या ठिकाणी विक्री केले जातात.शेंग तेलापासून इतर सर्व वस्तू बनवल्या जातात. अगदी आपल्या घरामध्ये कोणतेही शुभकार्य असले की तातडीने शुभकार्य करणाऱ्यांची पावले खरेदीसाठी विटा शहरात कोरे स्वीट मार्टकडे वळतात.

पेढ्याची चवच लय न्यारी म्हणून तर विटा शहरात प्रसिद्ध असणारे कोरे स्वीट मार्ट खव्याच्या पेढ्यासाठी लय भारी अशी चर्चा सध्या विटे शहरासह खानापूर तालुक्यात होताना दिसून येत आहे. सध्या विद्यार्थी वर्ग आपला निकाल लागला की, या ठिकाणी पेढे खरेदी करण्यासाठी गर्दी करताना दिसून येतात.

# कराडला पत्रकारांसाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर कार्यशाळा

## एमकेसील आणि सनबीम संस्थेतर्फे आयोजन; अधिक माहिती एमएससीआयटी केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन

**कराड/प्रतिनिधी : -**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ आणि सनबीम संस्थेच्यावतीने पत्रकारांसाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा (कृत्रिम बुद्धिमत्ता) पत्रकारीतेत वापर या विषयावर आधारित मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सध्याच्या तंत्रज्ञान युगात एआयचे महत्त्व आणि त्याचा दैनंदिन जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये होणारा वापर लक्षात घेता, ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे विनायक कदम, त्यांचे सहकारी दीपक कुंभार यांनी चॉट जीपीटी आणि इतर एआय जनरेटर्सच्या मदतीने कार्यालयीन कामकाज आणि दैनंदिन कामे कमी वेळेत आणि कमी खर्चात कशा प्रकारे सोपी करता येतील, याबद्दल सखोल माहिती दिली.

महामंडळाचे दक्षिण विभागीय समन्वयक अनिल गावंडे यांनी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या एमएससीआयटी या संगणक अभ्यासक्रमात १०० पेक्षा अधिक आर्टिफिशियल इंटेलिजन्स टूल्स शिकवले जातात. हा अभ्यासक्रम शालेय विद्यार्थी, पालक, शिक्षक, गृहिणी, व्यावसायिक आणि नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी अत्यंत उपयुक्त आहे, हे सांगितले. या कार्यशाळेच्या माध्यमातून पत्रकारांना एआय तंत्रज्ञानाची माहिती मिळाली आणि



त्याचा उपयोग त्यांच्या कामात कसा करता येईल, याची माहिती मिळाली. अधिक माहिती आणि या अभ्यासक्रमात सहभागी होण्यासाठी जवळच्या एमएससीआयटी केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्यावतीने श्री. गावंडे यांनी यावेळी केले.

# जगात मनामनात बुद्ध रुजवण्याची जबाबदारी भारतीयांची

## प्रा.डॉ.सुभाष वाघमारे:रुई -कोरेगाव येथे बुद्ध व आंबेडकर जयंती साजरी

**सातारा/प्रतिनिधी:**

गौतम बुद्धांचा विचार हा जगभरातील माणसांना सुखशांती देणारा विचार असून स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मुल्ये जगभरात पोचवण्याची आज गरज आहे. भारताच्या भूमीत चिंतनातून जन्मास आलेले हे सुखाचे तत्वज्ञान असून ते स्वार्थी तत्वज्ञान नाही तर नैतिक आचरण याला महत्व देणारा धम्म आहे. विषमता, दैववाद, हिंसा, अंधश्रद्धा, अज्ञान, ईश्वर, याना महत्व न देता माणसाने सदाचरणी व्हावे, मैत्री भावना जपावी, सर्वांनी ज्ञानी व्हावे, सर्वांनी जीवनाचे यथार्थ ज्ञान समजून घ्यावे, निर्व्यसनी रहावे, करुणाशील असावे, नियमित उद्योगी राहून आपले कुटुंब आणि समाज सुखी ठेवावा, कुशल कर्मेच करावीत, असे उत्साही असा धम्म आहे. जगातल्या प्रत्येक माणसाच्या मनाची सुधारणा झाल्याशिवाय जगाची सुधारणा होणार नाही.'असे मत छत्रपती शिवाजी कॉलेजचे उपप्राचार्य व कर्मवीर



भाऊराव पाटील विद्यापीठाच्या भाषा मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.डॉ.सुभाष वाघमारे यांनी व्यक्त केले.

यावेळी सरपंच सौ. संगीता सुतार, तेजेस शिंदे,.घनश्याम शिंदे.. संतोष सावंत, समीर वीर, माजी सरपंच अनिल सावंत, उपसरपंच लक्ष्मण कुंभार, जयश्री किर्तीकुडवे, सतीश वीर., प्रभाकर वीर, प्रफुल्ल सोळसकर, विद्याताई घाडगे, हनीफ मुलाणी अध्यक्ष– विलास कुडवे. सचिव अमर किर्तीकुडवे, अरविंद किर्तीकुडवे, सुनील कुडवे, सौ. सुलोचना कुडवे, सौ. प्रिया कुडवे, श्रीमती. नंदा निकाळजे, सौ. सोनाली कुडवे, सौ.सुमन कुडवे, सौ.सीमा कुडवे, श्रीमती रंजना कुडवे, श्रीमती.विमल कुडवे, सौ. नंदा कुडवे, श्रीमती – संगीता वाघमारे. सौ. वंदना कुडवे, सौ. शुभांगी यादव, सौ. सुनंदा खरात, सौ.गौरी भोसले, सौ. सुरेखा कुडवे, सौ. सावित्रा कुडवे, सौ. देवता कुडवे इत्यादीची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी बाबासाहेब आंबेडकर यांचे सातारयातील बालपण सांगत त्यांनी त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला ते म्हणाले ' शाळेत त्यांना अस्पृश्य असल्याने पाणी देखील दुरून वाढले जात होते. अशा एका विद्यार्थ्याने दारिद्र्य आणि जातीभेद याच्याशी सामना करीत सामाजिक प्रश्न ध्यानात घेऊन, वाचन, चिंतन, मनन, घेऊन भारतातील जातीभेद, प्राचीन व्यापार, भारताची आर्थिक स्थिती, शोषण, धर्म व्यवस्था, चातुर्वर्ण्य व्यवस्था या संबंधीचे सत्य प्रबंध आणि निबंधातून जगासमोर आणले. देशातील आर्थिक सामाजिक विषमतेची मुळे धर्म व्यवस्थेच्या रचनेत असल्याने भेदभाव करणारी धर्मव्यवस्था देशात ऐक्य निर्माण होऊ देत नाही.

प्रारंभी बुद्ध वंदना घेण्यात आली. त्यानंतर सत्कार व स्वागत समारंभ झाला. विविध स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. विजय कुडवे, कैलास कुडवे, प्रमोद कुडवे, अशोक कुडवे, रामचंद्र खरात, दत्तात्रय खरात, सूर्यकांत भोसले, प्रकाश यादव, विठ्ठल घाडगे, समाधान वाघमारे, जालिंदर कुडवे, भीमराव कुडवे, सागर कुडवे, तात्याबा कुडवे, विजय कुडवे. आजी माजी ग्रामपंचायत सदस्य, भीमगर्जना नवतरुण मित्र मंडळ रुईचे कार्यकर्ते इत्यादींची उपस्थिती होती.



अभिवादन करताना दयानंद जगताप,वीर,जाधव, भोळे आदी.

# पाटण येथे विहार व स्मारकमध्ये बुद्ध जयंती साजरी

**पाटण/प्रतिनिधी :**

येथील बोधिसत्व बुद्ध विहार व डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकमध्ये विविध संघटनांच्यावतीने पुष्पहार मूर्तींना अर्पण करून अभिवादन करून बुद्ध जयंती साजरी करण्यात आली.

विहारमध्ये भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष आनंदा भंडारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास माजी तालुकाध्यक्ष आत्माराम कांबळे, पर्यटन विभागाचे मिलिंद कांबळे (बापू), संस्कार विभागाचे प्रकाश कांबळे, धम्मबांधव'चे सर्वेसर्वा अनिल वीर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

स्मारकमध्ये बार्टीचे समतादूत सागर जाधव व मान्यवरांनी मार्गदर्शन केले. यावेळी बंधुत्व पाटण भूषण दयानंद जगताप, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पश्चिम महाराष्ट्र सचिव प्रा.रवींद्र सोनावले, बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर, नितीन भोळे, सारंग जाधव आदी कार्यकर्ते उपस्थीत होते.

# विद्यार्थी, कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष रस्ते सुरक्षा प्रशिक्षण

**कोल्हापूर/प्रतिनिधी : -**

सुरक्षित रस्ते आणि जबाबदार वाहन चालविण्याच्या आपल्या उद्देशाला पुढे नेत, होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडियाने कोल्हापूर, महाराष्ट्र येथे रस्ता सुरक्षेसंबंधी जनजागृती कार्यक्रम आयोजित केला. या उपक्रमाने इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमधील १६०० हून अधिक विद्यार्थी आणि कर्मचारी सदस्यांना एक दिवसासाठी संवादात्मक सत्र आणि प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे रस्ता सुरक्षेची महत्त्वाची माहिती प्रदान केली.

हा उपक्रम होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडियाच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग आहे. ज्याचा उद्देश सहभागींमध्ये सुरक्षा प्रथम असा दृष्टीकोन विकसित करणे आहे. शिक्षण आणि अनुभवाच्या माध्यमातून वर्तनात्मक बदल घडविण्यावर लक्ष केंद्रित करत, या अभियानाने सहभागींची रस्ता सुरक्षेच्या मूलभूत गोष्टींशी सखोल ओळख करून दिली.



मंत्रालयाच्या रस्ता वाहतूक आणि महामार्ग विभागाच्या २०२२ च्या अहवालानुसार, महाराष्ट्रात एकूण ३३,३८३ रस्ते अपघात, १५,२२४ मृत्यू आणि २७,२३९ जखमींची नोंद झाली. ही आकडेवारी केवळ रस्त्यावर निष्काळजीपणाचे धोके अधोरेखित करत नाही, तर विविध भागांमध्ये सक्रिय जनजागृती मोहिमांचे महत्त्व देखील स्पष्ट करते.

कोल्हापूरमधील या उपक्रमाचा उद्देश युवा विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित वाहन चालविण्याच्या सवयींबद्दल जनजागृती निर्माण करणे हा होता. यासाठी संवादात्मक उपक्रमांचा समावेश करण्यात आला होता, ज्यामध्ये सुरक्षित वाहन चालवण्याचा सिद्धांत, हेल्मेट जनजागृती उपक्रम, स्थिर प्रात्यक्षिके, खेळ आणि प्रश्नमंजुषा यांचा समावेश होता.

# माजी विद्यार्थी शाळेचे मौल्यवान भुषण : आर.जी.कुलकर्णी

## वडगाव (ज.स्वा)त २००२ बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात

**पुसेसावळी/प्रतिनिधी:**

माजी विद्यार्थी हे शाळेचे एक महत्वाचे आणि मौल्यवान भूषण आहेत. ते केवळ शाळेच्या इतिहासाचा भाग नसतात, तर ते शाळेच्या भविष्यासाठीही एक महत्त्वपूर्ण आधारस्तंभ ठरतात व शाळेच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतात आणि शाळेला एक चांगली प्रतिमा देतात. त्यामुळे, शाळेला माजी विद्यार्थ्यांशी एक मजबूत संबंध ठेवणे आवश्यक आहे असे मत माजी प्राचार्य आर.जी. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

वडगाव(ज.स्वा) ता.खटाव येथे जयराम स्वामी विद्यामंदिर,दहावी सन २००२ च्या माजी विद्यार्थी मेळावाप्रसंगी ते बोलत होते.यावेळी प्राचार्य जे.बी.घार्गे, संजय पिसाळ, के. डी. दुटाळ, कृष्णत जाधव, सुनिल पुजारी, राहुल मोरे, ए.के.शिंदे, एस. आर.घार्गे, भुषण जाधव, अॅड. रुपेश खाडे, अमोल शेडगे यांसह माजी विद्यार्थी उपस्थित होते.

प्राचार्य जे.बी.घार्गे म्हणाले विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करणारे कर्तृत्ववान विद्यार्थी हेच शाळेचे खरे वैभव असते.माजी विद्यार्थी मेळावा म्हणजे शाळेविषयीचा कृतज्ञतेचा आणि प्रेमाचा सोहळा आहे.या सोहळ्याच्या माध्यमातून चांगले संस्कारपीठ निर्माण व्हावे व इतरांना आदर्शवत ठरावे



वडगाव (ज.स्वा) : माजी विद्यार्थी मेळाव्याप्रसंगी उपस्थित शिक्षक व माजी विद्यार्थी.

तसेच माजी विद्यार्थी यशस्वी होऊन भेटल्यावर नेहमी आनंदच होतो असे सांगून त्यांचे कौतुक केले व जुन्या आठवणींना उजाळा दिला.

२३ वर्षांनंतर मेळाव्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा एकत्र आलेले सर्व माजी विद्यार्थी आठवणीत हरवून गेले. प्रत्येकजण आपली शाळा कशी आहे हे डोळ्यांमध्ये साठवून घेत होता.वर्ग मित्र भेटल्याचा आनंद सर्वांच्याच चेहऱ्यावर दिसत होता.

माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व शिक्षक वृंदांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.तसेच शाळेला एलसीडी संच व ध्वनीक्षेपक यंत्रणा भेट देण्यात आली.यावेळी शिक्षक,माजी विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन गणेश सोलापुरे तर अतुल जाधव यांनी आभार मानले,कार्यक्रमानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

# बोरगाव (दे) येथील भोसले यांच्या शेळीने ४ करडू ना दिले जन्म बघ्यांची मोठी गर्दी

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

बोरगाव (दे) येथील भोसले यांच्या शेळीने ४ करडू ना जन्म दिले असून ही नवीन चार पिले बघण्यासाठी बघ्यांची मोठी गर्दी झाली आहे.

अक्कलकोट तालुका येथील बोरगांव (दे) येथील प्रगतशील शेतकरी आनंदराव भोसले यांच्या शेळीने ४ करडूनां जन्म दिले असून, शेती बरोबरच पशु पालनाचा जोड व्यवसाय समृद्ध ठरत असून, शेतकऱ्याने शेतीबरोबरच जोड व्यवसायाला महत्व देऊन कार्यरत राहणे ही काळाची गरज आहे, यावरून स्पष्ट होत आहे.

प्रगतशील शेतकरी आनंदराव भोसले यांनी शिवारातच कमी शेतजमीन, पाण्यामध्ये विविध हंगामातील पिकात अंतर पिके देखील घेतात. शेतीवरच अवलंबून न राहता जोड व्यवसायाकडे त्यांचा कल नेहमीचाच आहे. या मध्ये शेळी पालन देखील करत आहेत. त्यांच्या शेळीने ४ करडूनां जन्म दिले आहे. आनंदराव भोसले यांच्या कडे सध्या ३० शेळी ७ बोकड यांचे पालन करीत आहेत.

गेल्या अनेक वर्षापासून शेतीला जोड व्यवसाय म्हणून शेळी पालन व्यवसाय आनंदराव भोसले हे करत आहेत. अन्य शेतकऱ्याने देखील केवळ शेतीवरच अवलंबून न राहाता शेती पूरक जोड व्यवसाय करावा असा संदेश या माध्यमातून भोसले यांच्याकडून दिला जात आहे.

शेळीच्या ४ करडूनां पाहण्यासाठी



आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी भोसले यांच्या फार्महाऊसला गर्दी केलेली होती. आनंदराव भोसले त्यांचे पुत्र शरद भोसले शेतीसह जोड व्यवसायाला मोलाची साथ देत आहेत. बोरगाव (दे) येथील भोसले यांच्या शेळीने ४ करडू ना जन्म दिले असून ही नवीन चार पिले बघण्यासाठी बघ्यांची मोठी गर्दी झाली आहे.आणि या घटनेचीच पंचक्रोशीत चर्चा सुरू आहे.

### शेतकऱ्यांनी जोड व्यवसायाला महत्व द्यावे

अलीकडच्या काळातील पर्जन्यमान, हवामान पाहता शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक वेळा हाताला आलेले पिक वाया जाणे, धान्याला भाव न मिळणे आशा कठीण प्रसंगाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. आशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी शेतकऱ्यांनी जोड व्यवसायाला महत्व देवून शेती करावी.

आनंदराव भोसले
प्रगतशील शेतकरी, बोरगांव (दे)



प्रकाशनाबरोबरच मिलिंद पवार यांना पुस्तक प्रदान करताना मान्यवर.

# श्रीमंत पाटणकर वाचनालयात प्रकाशन सोहळा संपन्न

**सातारा/प्रतिनिधी:**

बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर लिखित, संघर्षमय जीवनगाथा या पुस्तकाचे प्रकाशन पाटण येथील श्रीमंत पाटणकर वाचनालयात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते यशवंतराव जगताप, माजी सरपंच रामचंद्र मोरे, तानाजी साळुंखे, दत्तात्रय कवडे, मनोहर यादव, ज्येष्ठ पत्रकार मिलिंद पवार, ग्रंथपाल, कर्मचारी व वाचकवर्ग उपस्थीत होते.

# कराडमध्ये बुधवारी छत्रपती संभाजी महाराज जयंती

**कराड/प्रतिनिधी : -**

येथील स्वराज्य रक्षक श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज स्मारक समितीच्या वतीने बुधवारी १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे संस्थापक सचिव रणजीत पाटील यांनी दिली.

जयंतीनिमित्त शंभू तीर्थ येथील छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या जागेत छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन सकाळी नऊ वाजता करण्यात येणार आहे. शिवप्रेमी व शंभू प्रेमींनी यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन रणजीत पाटील यांनी केले आहे. याशिवाय शहर व तालुक्यातही सार्वजनिक मंडळांनी छत्रपती संभाजी महाराजांची जयंती भव्य प्रमाणात साजरी करावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

शंभूतीर्थ येथे सुमारे १२ कोटी रुपयांचे छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारकाचे काम सुरू आहे. हे स्मारक लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# बुद्ध पौर्णिमेनिमित्त हजारो भाविकांनी घेतले श्री स्वामी समर्थांचे दर्शन

## युध्द सदृष्य परिस्थितीनंतर आज बुद्ध पौर्णिमेरोजी पुन्हा भाविकांची स्वामी दर्शनाकरिता गर्दी

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले येथील श्री वटवृक्ष निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांचे मंदिर म्हणजे श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान होय. आज पौर्णिमेनिमित्त पहाटे ५ वाजता श्रींची काकड आरती नैवेद्य आरती संपन्न झाली. पहाटेपासूनच सर्व पुरुष व महिला भक्तांना वेगवेगळ्या रांगेतून दर्शनास सोडण्यात आले. आषाढी, चैत्री, कार्तिकी, माघी वारीला जसे वारकरी पंढरपूरची वारी करतात तसे येथील श्री स्वामी समर्थांचे भक्त दर पौर्णिमेला अक्कलकोटची वारी करीत आहेत, त्यामुळे श्री स्वामी समर्थांच्या भक्त संख्येत कमालीची घनता दिसून येत आहे. येणाऱ्या सर्व स्वामी भक्तांच्या सुलभ स्वामी दर्शना प्रित्यर्थ मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी स्वत: पुढाकार घेऊन वारंवार विविध उपाय योजना राबविण्यात व्यस्त आहेत. त्याचेच एक भाग म्हणून आता गेल्या काही दिवसांपासून



श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात पुरुष व महिला स्वामी भक्तांना वेगवेगळ्या रांगेतून दर्शनास सोडण्यात येत आहे. या निमित्ताने सर्व स्वामी भक्तांचे स्वामी दर्शन सुलभ होऊन भाविकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत आहे. यासोबतच वयोवृद्ध व विकलांग भाविकांना व्हीलचेअरची सोय असून स्वतंत्र दर्शन व्यवस्थेच्या रांगेतून स्वामी दर्शनास सोडण्यात येत आहे, त्यामुळे येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील स्वामी दर्शनाची व्यवस्था मंदिर समितीच्या वतीने आहे त्या परिसरातच आता अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने अमलात आणले असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. याप्रसंगी काही भाविकांनी मनोगत व्यक्त करताना पुरुष व महिला स्वामी भक्तांना वेगवेगळ्या रांगेतून दर्शनास सोडण्यात येत असल्याने धक्काबुक्की व चेंगराचेंगरीतून मुक्ती मिळून शांतचित्ताने व प्रसन्न वातावरणात स्वामी समर्थांचे दर्शन होत असल्याबद्दल मंदिर समितीचे आभार मानले. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, व्यंकटेश पुजारी, मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे, सेक्रेटरी आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, श्रीकांत मलवे, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, तुषार मोरे, श्रीपाद सरदेशमुख, सिद्धाराम कुंभार, ऋषिकेश लोणारी आदींसह मंदिर समितीचे कर्मचारी सेवेकऱ्यांनी उपस्थित राहून सर्व स्वामी भक्तांच्या सुलभ स्वामी दर्शनासाठी परिश्रम घेतले.


सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

नशिबाची परीक्षा
मंगळवार १३ मे २०२५

मिलनम डे
उदय-अस्त सिंगल १-३-८ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 146<br>128<br>100 | 1-0 | 190<br>127<br>550 | 12-70-84-09-35 |

कल्याणम
उदय-अस्त सिंगल २-४-० मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 129<br>480<br>660 | 2-7 | 124<br>179<br>115 | 26-97-41-03-75 |

मुंबैम (मेन )
उदय-अस्त सिंगल ०-३-१ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 145<br>280<br>460 | 0-6 | 123<br>448<br>880 | 2-46-53-18-69 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

आज का अंदाज

मंगळवार दिनांक १३ मे २०२५

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| १ - ४ - ७ - ८ | २ - ५ - ६ - ७ |
| १५५-१६७-१७९-१८९ | १४७-१४०-१६९-१८८ |
| २३६-३५६-३५९-३७८ | ३९०-२५८-१४९-४५८ |
| ४८९-२२०-४६७-२२४ | २००-६९०-७९०-२६९ |
| जोडी | जोडी |
| १२ -४२ - ७३ - ८३ | २० -५० - ६९ - ७३ |
| १६ -४६ - ७५ - ८५ | २१ -५१ - ९८ - ७८ |
| १० -४० - ७९ - ८९ | २९ -५९ - ६४ - ७४ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १३-१४ मे
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

मंगळवार दिनांक १३ मे २०२५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सर्व बाजार साठी | २१ | ३१ | ६४ | ९४ |
| | २७ | ३७ | ६८ | ९८ |
| | २० | ३० | ६५ | ९५ |
| | १४७ | १२० | १५० | १८० |
| | २२८ | ३०० | २६८ | ३७९ |
| | ३९० | २२९ | ७९० | ५६८ |

टिप- कल्याण व मुंबई करिता व सर्व बाजारासाठी ६० पानाचा चार्ट मिळेल १००% खात्रीशीर फक्त सोमवारी मिळेल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# दिव्यांग प्रेरणा संस्थेच्या आंदोलनाची शिवेंद्रसिंहराजे यांच्याकडून दखल

## मागण्या पूर्ण करण्याचा दिला शब्द

**सातारा/प्रतिनिधी:**
दिव्यांग प्रेरणा सामाजिक संस्थेच्या वतीने साताऱ्यात गेल्या चार दिवसापासून विविध मागण्यांसाठी बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले होते या आंदोलनाची सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी साताऱ्यात येतात तत्काळ दखल घेतली स्वतः उपोषण स्थळी जाऊन त्यांनी दिव्यांग बांधवांशी चर्चा करून त्यांना ते प्रश्न सोडवण्याचा शब्द दिला. दिव्यांग प्रेरणा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अजय पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी येथील आरटीओ चौकामध्ये हे आंदोलन सुरू केले होते.

दिव्यांग बांधवांना शासकीय कार्यालयामध्ये रॅम सुविधा तसेच शैक्षणिक व रोजच्या चरितार्थ विशिष्ट वेतन भत्ता याबाबतच्या त्यांच्या मागण्या होत्या तसेच उदरनिर्वाहासाठी राज्य शासनाकडून ठराविक क्षेत्र आणि व्यवसायासाठी जागादेणे या कामांसाठी सातत्याने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असल्यापासून पाठपुरावा सुरू ठेवला होता तसेच आझाद मैदानावर सुद्धा दिव्यांग प्रेरणा सामाजिक संस्थेने आंदोलन केले होते मात्र त्याला विशेष प्रतिसाद मिळाला नाही त्यामुळेदिव्यांग बांधवांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते.



शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिव्यांग बांधवांशी चर्चा केली त्यांचे प्रश्न समजावून घेतले आणि त्यांना तात्काळ अन्नत्याग आंदोलन करण्यापासून प्रवृत्त केले दिव्यांग बांधवांनी शिवसेनेचे राजे भोसले यांच्याकडे मागण्यांची पुन्हा निवेदन सादर केले मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून त्या मागण्या पूर्ण करण्याच्या मी निश्चित प्रयत्न करतो असे शिवेंद्रसिंहराजे यांनी आश्वासन दिले.



# साताऱ्यात बौध्द जयंती निमित्ताने रॅली

**सातारा/प्रतिनिधी:**
भारतीय बौध्द महासभा सातारा शाखा, रिपब्लिकन सेना, बौद्ध बांधव यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा शहरात सोमवारी सकाळी ११ वाजता छ. शाहु महाराज चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून बौद्ध जयंतीनिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास अभिवादन करुन रॅलीला प्रारंभ झाला.

ही रॅली पुढे कमानी हौद, देवी चौक, गोलबागेला वळसा मारुन मोती चौक, पाचशे एक पाटी, पोलीस मुख्यालय, शिवतीर्थ अशी पोहचली. शिवतीर्थ येथे छ. शिवाजी महाराजांच्या स्मारकास अभिवादन करुन या रॅलीचा समारोप करण्यात आला. या रॅलीमध्ये चंद्रकांत खंडाईत, गणेश कारंडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# कुंडल येथील दिगंबर जैन समाजाच्या पवित्र स्थळी मूर्ती विटंबना व मोडतोड करणाऱ्यावर कारवाई करावी

## आ.जयंत पाटील यांचे राज्याच्या मुख्यमंत्र्यांना पत्र

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**
कुंडल (ता.पलूस) येथील दिगंबर जैन समाजाच्या पवित्रस्थळातील मूर्ती विटंबना व मोडतोड करणाऱ्या गुन्हेगाराचा तातडीने शोध घेऊन त्याच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष,माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे. या पत्रात आ.पाटील यांनी अल्पसंख्यांक समाजाच्या पवित्र स्थळावर सातत्याने होणाऱ्या हल्ल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

कुंडल (ता.पलूस) येथे श्री १००८ गिरी पार्श्वनाथ या पवित्र स्थळी गेल्या ८ दिवसापूर्वी मूर्तीची विटंबना आणि मोडतोड करण्यात आली आहे. अद्याप या समाज कंटकाचा शोध घेण्यात पोलीस खात्यास यश झालेले नाही. अलिकडे अल्पसंख्यांक समाजाच्या श्रध्दा स्थळावर होणाऱ्या हल्ल्यात वाढ झाली आहे, हे चिंताजनक आहे. पोलीस खात्याने कुंडल येथील मूर्ती विटंबना व मोडतोड प्रकरणातील आरोपीस तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी. यातून सरकारने अल्पसंख्यांक समाजाला दिलासा द्यावा,असे आ.पाटील यांनी पत्रात शेवटी म्हंटले आहे.



# घरगुती वाद मिटविण्यासाठी घेतलेल्या बैठकीत वृद्धास मारहाण

## चार जणांवर गुन्हा दाखल

**विटा / प्रतिनिधी:-**
घरगुती वाद मिटविण्यासाठी घेतलेल्या बैठकीत एका वृद्धास मारहाण केल्याच्या संशयावरून खंबाळे येथे चार जणांवर विटा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी संबंधितांवर पोलिसांनी गुरनं २५१/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५१(२), ३५२,३(५) प्रमाणे गुन्हा नोंद झाला असून सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास पोहेकॉ पठाण व पुढील तपास पोहेकॉ खरमाटे हे करीत आहेत.

खंबाळे ता. खानापूर जि. सांगली येथील मारुती मंदिरासमोर दि. १२ मे रोजी सकाळच्या सुमारास प्रकाश पांडूरंग सुर्वे (७३) व गावातील जनार्दन पाडूरंग सुर्वे, मंदाकिनी जनार्धन सुर्वे, हर्षद जनार्धन सुर्वे, रोहीत जनार्धन सुर्वे हे सुर्वे कुटुंबिय यांच्यातील सतत होणारे जुने वाद मिटविण्यासाठी बैठक घेण्यात आली होती. प्रकाश सुर्वे व जनार्दन सुर्वे हे दोघे भाऊ असून त्यांच्यातील जुने वाद तसेच होते. वाद मिटवणे बाजूलाच, परंतु सुर्वे कुटुंबातील काही जणांनी प्रकाश सुर्वे यांना अचानकरित्या मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी मंदाकिनी जनार्दन सुर्वे यांनी प्रकाश सुर्वे यांना शिवीगाळ केली. तसेच जनार्दन सुर्वे यांचा मुलगा हर्षद याने प्रकाश सुर्वे यांच्या डोक्यात हातातील कड्याने मारून त्यांना दुखापत केली.

जनार्दन सुर्वे यांचा थोरला मुलगा रोहित सुर्वे याने प्रकाश सुर्वे यांचा मुलगा सचिन याला धक्काबुकी करत शिवीगाळ करून



जिवे मारण्याची धमकी दिली. सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास पोहेकॉ पठाण व पुढील तपास पोहेकॉ खरमाटे हे करीत आहेत.



# वांगीत पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहास उदंड प्रतिसाद

**कडेगाव/प्रतिनिधी:**
वांगी (ता. कडेगाव) येथे सालाबादाप्रमाणे साजरा करण्यात येणाऱ्या पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहास ४५ वर्षाची परंपरा लाभली आहे. गावातील वारकरी संप्रदायाचा वारसा असलेल्या कुटुंबातील युवकांनी या पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे सुयोग्य नियोजन केल्याने लोकांचा उदंड प्रतिसाद लाभत आहे.

गेली अनेक वर्षे हा सोहळा साजरा होत असताना कीर्तन व प्रवचन यांसारख्या समाजप्रबोधन करण्याच्या उपक्रमाला ग्रामस्थांचा कमी प्रतिसाद मिळत होता, मात्र गेल्या काही वर्षांपासून गावातील तरुण मंडळीच्या माध्यमातून पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे सुयोग्य नियोजनामुळे गावातील महिला, ज्येष्ठ मंडळी व युवक वर्गाचा मोठ्या प्रमाणात सहभाग वाढला आहे त्यामुळे भक्ती शक्तीची परंपरा असलेल्या महाराष्ट्राच्या दैदीप्यमान इतिहासाचे अवलोकन वांगीच्या ग्रामभुमित होत आहे समतेचे दैवत असणाऱ्या पांडुरंग व संत महात्मे यांची शिकवण असणाऱ्या महाराष्ट्राला भक्तीचा वारसा लाभला आहे. तसेच या गावच्या सोहळ्याने तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात समाजप्रबोधन होवून युवक भक्तिमय मार्गाने एकजूट होवू लागली आहे.

या सामुदायिक पारायण सोहळ्या मध्ये पहाटे काकड आरती तदनंतर गाथा पारायण या ग्रंथाचे वाचन, त्यांनंतर हरिपाठ आणि रात्री कीर्तन सेवा हे या उपक्रमांची सेवा राबवली जात आहे. नऊ दिवसाच्या पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून ग्रामस्थांमध्ये भक्तीची बिजे रोवली जात आहेत.

# अक्कलकोट नगरपरिषदेचे गेल्या चार वर्षांपासून पोस्ट ऑडिटच झाले नाही :चौकशीची मागणी

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**
अक्कलकोट नगरपालिकेला केंद्र व राज्य शासनाकडून विविध प्रकारचे अनुदान मिळते, पालिकेत त्याचे प्री ऑडिट होते मात्र पोस्ट ऑडिट होत नाही. किती अनुदान आले किती खर्च झाला शिल्लक किती? या बाबतचे गेल्या ४ वर्षातील ऑडीट करण्याची मागणी आर.पी.आय. आठवले गटाचे तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, राज्य मंत्री ना. माधुरी मिसाळ यांच्याकडे केली आहे.

मागणीत अविनाश मडीखांबे यांनी नमूद केले आहे कि, अक्कलकोट नगरपरिषदेत गेल्या ४ वर्षापासून प्रशासक राज आहे. गेल्या ४ वर्षात तत्कालीन मुख्याधिकारी सचिन पाटील यांच्या नंतर सध्या मुख्याधिकारी म्हणून रमाकांत डाके हे कार्यरत आहेत. सचिन पाटील हे कार्यरत असताना राज्य व केंद्र शासनाचा विविध योजनेचा निधी मिळाला आहे. या निधीतून मनमानी पद्धतीने विकास कामे हाती घेण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर विकास विभागाच्या मंजुरी नंतर कोठ्यावादी रुपयांची विकास कामे निकृष्ट दर्ज्याची झालेली आहेत. यामध्ये प्रामुख्याने कारंजा चौकातील तारामाता उद्यान, नविन राजवाडा रोड, व्ही. आय. पी. रस्त्यावरील लहान मुलांकरिता लाखो रुपयांचे खेळाचे मनोरंजनात्मक साहित्य बसविण्यात आली हे देखील मनमानी पद्धतीने निविदा कडून सदरचे काम मर्जीतील ठेकेदारास देऊन पूर्ण करण्यात आले. मात्र सदर लोकार्पण अध्यापही झालेले नाही. याबरोबरच त्यांच्या काळात रस्ता स्वच्छ करण्याचे भले मोठे ट्रक घेण्यात आले, चक्क ते नगरपरिषदे समोर गेल्या २ वर्षापासून धूळ खात पडून आहे.

सध्या श्री क्षेत्र अक्कलकोट मध्ये तीर्थ क्षेत्र विकास निधी सोडून कोठ्यावधी रुपयांची कामे सुरु आहेत. या सह यात्रा अनुदान, राज्य नगरोत्थान, रस्ता अनुदान, यात्रा अनुदान, या केंद्र व राज्य शासनाच्या निधीच्या माध्यमातून कामे देखील सुरु आहेत. ही कामे सध्या मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या अधिपत्याखाली सुरु आहेत. यांच्या व तत्कालीन मुख्याधिकारी सचिन पाटील यांच्या कार्यकाळात विकास कामे व निधीचे लेख परीक्षण व्हावे अशी मागणी आर.पी.आय. आठवले गटाचे तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, राज्य मंत्री ना. माधुरी मिसाळ यांच्याकडे केली आहे.

आयलॅन्डन चा कारंजा अन शहराला १५ दिवसाला पाणी पुरवठा- शहराला सांगवी जलाशयात मुबलक पाणी असताना नगरपरिषदेच्या नियोजन अभावी १२ ते १५ दिवसाला प्रभागनिहाय पाणी पुरवठा केला जातो. शहराची




लोकसंख्या व तरंगती लोकसंख्या पाहता गेल्या अनेक वर्षापासून श्री क्षेत्र अक्कालकोटची पाणी व्यवस्था कोलमडलेलीच आहे. आशा स्थितीत देखील नगरपरिषदेकडून ए-वन चौकातील आयलॅन्डन चा कारंजा सुरु ठेऊन जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार वेळोवेळी घडत आहे. कुरनूर असो वा सांगवी, धरण उशाला कोरड घश्याला अशी अवस्था शहरवासीयांची झाली आहे.


अविनाश मडीखांबे
आर.पी.आय.आठवले गटाचे तालुका अध्यक्ष

# आज खातगुण सोसायटीच्या नूतनसहकार भवन इमारतीचा उद्घाटन सोहळा

**पुसेगाव/प्रतिनिधी:**
खातगुण विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेड खातगुण सहकार भवन नूतन इमारतीचा उद्घाटन सोहळा मंगळवार दिनांक १३ मे रोजी दुपारी ४ वाजता जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष सातारा राज्यसभा सदस्य भारत सरकार खा. नितीन काका लक्ष्मणराव पाटील व मा आ. शशिकांत जयवंतराव शिंदे यांचे शुभ हस्ते घेण्यात येणार आहे.

विविध कार्यकारी सोसायटी सहकार भवन या इमारतीच्या बांधकामासाठी मुख्य प्रवर्तक वसंत कृष्णा जाधव गुरुजी यांचे मार्गदर्शनाने तसेच माजी चेअरमन विजय लावंड यांचे विशेष प्रयत्नाने सोसायटीचे आजी-माजी चेअरमन व सदस्य यांच्या सहकार्याने साकारलेल्या सहकार भवन या सोसायटीच्या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख उपस्थिती जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई, मा.आमदार व जिल्हा बँकेचे सदस्य प्रभाकर घार्गे, जिल्हा बँकेचे संचालक प्रदीप विधाते, जिल्हा बँकेचे सीईओ राजेंद्र सरकाळे हे उपस्थित राहणार आहेत.

याखेरीज विशेष उपस्थिती दाजी खताळ, घनश्याम सावंत, श्रीमती दिपाली सावंत, शामराव भोसले, मुसा शेख, आनंदराव लावंड, पांडुरंग जाधव, आनंदराव भोसले, अशोक लावंड, सौ कल्याणी पवार, रामदास लावंड, प्रमोद भोसले, या संस्थेच्या सोसायटीच्या सहकार भवन बांधकामासाठी खास सहकार्य व योगदान दिले असे मुख्य प्रवर्तक वसंत जाधव गुरुजी, मा.चेअरमन विजय मानसिंग लावंड, विद्यमान



चेअरमन नानासो लावंड, व्हॉइस चेअरमन विठ्ठल पवार व सर्व संचालक उद्घाटन सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी प्रयत्नशील असणार आहेत. दि. १३ मे रोजी सायंकाळी ४ वाजता सहकार भवन या इमारतीचा उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे.




येडेनिपाणी : नूतन अध्यक्ष डॉ. प्रकाश पाटील यांचा सत्कार करताना निवडणूक निर्णय अधिकारी सुरेश पाटील, समवेत उपाध्यक्ष माधुरी घाडगे व सर्व नूतन संचालक.

# येडेनिपाणी येथील मल्लिकार्जुन दुधसंस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.प्रकाश पाटील तर उपाध्यक्षपदी माधूरी घाडगे

**इस्लामपूर/प्रतिनिधी : -**
येडेनिपाणी (ता. वाळवा) येथील मल्लिकार्जुन सहकारी दुध संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ. प्रकाश पाटील (काका) व उपाध्यक्षपदी माधूरी घाडगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तालुका उपनिबंधक सुरेश पाटील उपस्थित होते.

यावेळी निवडण्यात आलेल्या संचालक मंडळात प्रकाश पाटील, बाळासो पाटील, धोंडीराम खाडे पाटील, लक्ष्मण रणनवरे, सुभाष पाटील, सुरेखा पाटील, विकास कांबळे, मधुकर कोळेकर, भिमराव माळी, कुंडलिक कोळी, बाजीराव वायदंडे यांचा समावेश आहे. या निवडीवेळी राजाराम पाटील, मकरंद पाटील, प्रताप पाटील,अर्जुन पाटील, माणिक पाटील, रायसिंग पाटील, नामदेव खड्डे, दिलीप पाटील, एस. एस. पाटील, सुकुमार पाटील, संदीप पाटील, विजयमाला पाटील, विमल पाटील, नंदा पाटील, वेदिका पाटील, सिंधुताई माळी, स्मिता पाटील उपस्थित होत्या. सचिव युवराज पाटील यांनी आभार मानले. निवडीनंतर अध्यक्ष उपाध्यक्ष व संचालक मंडळाचा सत्कार करण्यात आला.

# दुष्काळात तेरावा महिना...

## डीपीत बिघाड; शेतकरी हवालदिल

**चाफळ/प्रतिनिधी:**
कळंत्रेवाडी, ता. कराड येथील उत्तरमांड नदी काठालगत असलेल्या स्मशानभूमी शेजारील असलेल्या महावितरणच्या विद्युत डीपी मध्ये काल दुपारी अचानकपणे तांत्रिक बिघाड झाल्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाले आहेत.

सध्या कडक उन्हाळ्याचे दिवस सुरू आहेत. सूर्यनारायण आग ओकत आहेत. ऐन उन्हाळ्यात सदर डीपी मध्ये झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे दुष्काळात तेरावा महिना अशीच काहीशी परिस्थिती येथील शेतकऱ्यांच्या नशिबी आली आहे. बऱ्याच कालावधीपासून सदर डीपी मध्ये वरचेवर तांत्रिक बिघाड होत होते.



त्यानंतर त्या परिसरात महावितरणने दुसरा डीपी कार्यान्वित करून सदर डीपी वरील लोड कमी केला. परंतु, काही महिने सुरळीत चालल्यानंतर येरे माझ्या मागल्याप्रमाणे रविवार दिनांक ११ मे रोजी स्मशानभूमी डीपी मध्ये स्पार्किंग होत ट्रान्सफॉर्मर मधून ऑइलचे फवारे उडाल्यानंतर डीपी बंद पडल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली असून शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

### डीपी लवकरच सुस्थितीत करू

सदर डीपीच्या तांत्रिक घोटाळ्याची माहिती स्थानिक वायरमनने दिली असून वरिष्ठ कार्यालयाला कळवण्यात आले आहे. त्यामुळे डीपी शक्य तितक्या लवकर दुरुस्त करण्यात येईल.

श्री काकडे (अधिकारी-उंब्रज महावितरण कार्यालय)

# साताऱ्यात राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**सातारा/प्रतिनिधी:**
साताऱ्यात श्री शिवाजी उदय मंडळाचे संस्थापक गुरुवर्य बबनराव उथळे यांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त दि. १८ व १९ मे रोजी गुरुवर्य चषक राज्यस्तरीय कब्बडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत मंडळाचे अध्यक्ष गोपाळराव माने यांनी दिली. या स्पर्धेचे उद्घाटन खासदार श्रीमंत छ. उदयनराजे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छ. शिवेंद्रराजे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे यावेळी मुख्याधिकारी अभिजित बापट उपस्थित राहणार आहेत, असे मंडळाचे सचिव शिवप्रसाद उथळे यांनी सांगितले.

गोपाळराव माने म्हणाले, शिवाजी उदय मंडळाचे संस्थापक, शिवछत्रपती पुरस्कार विजेते, क्रीडा महर्षी, गुरूवर्य ल. स. तथा बबनराव उथळे यांच्या ९९ व्या जयंती निमित्त गुरूवर्य चषक भव्य राज्यस्तरीय पुरूष निमंत्रीत कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत राज्यातील १२ नामवंत संघाचा सहभाग आहे. गुरूवर्य बबनराव उथळे यांनी आपले आयुष्य क्रीडा सेवेसाठी समर्पित केले होते. ८० वर्षांची क्रीडा व सांस्कृतिक परंपरा असलेल्या श्री शिवाजी उदय मंडळाच्या माध्यमातून गुरूवर्य आण्णांनी आजवर अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवले. मंडळाने आजवर आण्णांच्या मार्गदर्शनाखाली ७ खेळाडूंनी शिवछत्रपती पुरस्कार मिळवले आहेत. राष्ट्रपती पुरस्कार २, जिल्हा क्रीडा पुरस्कार ३, आंतरराष्ट्रीय पुरस्कार २ मिळविले आहेत. संस्थेच्या जिल्ह्यात शिवथर, वळसे तर पुणे जिल्ह्यात चिंचवड आणि लोणावळा या ठिकाणी शाखा कार्यरत आहेत. आण्णांनी सुरू केलेले हे कार्य अविरत सुरु राहील या दृष्टीकोनातून या कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी एकूण सव्वा लाखाची बक्षिसे रोख रक्कम स्वरूपात विजेत्या संघांना चषक व उत्कृष्ठ खेळाडूंना देण्यात येणार आहेत. यामध्ये अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि प्रो कबड्डी मध्ये सहभाग असणाऱ्या खेळाडूंचा खेळ पाहण्याची पर्वणी सातारकर क्रीडा रसिकांना मिळणार आहे.

या गुरूवर्य चषक स्पर्धेचे उद्घाटन रविवार, दि.१८ रोजी सायंकाळी ७ वा. मंडळाच्या क्रीडांगणावर होणार आहे. या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा लाभ सातारा शहरातील क्रीडा रसिकांनी घ्यावा असे आवाहन मंडळाचे सचिव शिवप्रसाद उथळे यांनी केले आहे. एस. एम. पटेल नांदेड, इच्छाशक्ति क्रीडा मंडळ पालघर, सतेज संघ बाणेर, अंबिका सेवा मंडळ मुंबई उपनगर, जयंत स्पोर्टस क्लब इस्लामपूर, आझाद टाकळीभाण अहिल्यानगर, स्वस्तिक संघ मुंबई उपनगर, भैरवनाथ भोसरी पुणे, शिवमुद्रा कौलव कोल्हापूर, न्यु हिंद विजयी चिपळूण, मावळी क्रीडा मंडळ ठाणे, साई सेवा मंडळ छत्रपती संभाजी नगर आदी संघांनी सहभाग घेतला आहे. त्यातील निलेश काळ भेरे, विराज लांडगे, शिवछत्रपती पुरस्कार विजेता तेजस पाटील, किरण मगर, शैलेश गराळे, अक्रम शेख, अक्षय भरडे, शुभम पाटील, महादेव उगार, विश्वजीत घाडगे, ओम शिर्के, अमरसिंग कक्षप, यश निंबाळकर, कृष्णा पवार, राहुल डेके, साहिल पाटील, राज जयस्वाल, सुमित कदम, धीरज बैलमारे, वैभव मोरे, अल्केश चव्हाण यांचा सहभाग आहे.